# महाराष्ट्र विधानपरिषद
## तिसरे अधिवेशन, २०२२

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक २९ डिसेंबर, २०२२ / पौष ८, १९४४ (शके)**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **उप मुख्यमंत्री** | |
| **(२)** | **आदिवासी विकास मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(३)** | **बंदरे आणि खनिकर्म मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४८**

---

### मुंबईतील कुर्ला महानंदानगर झोपडपट्टी पुनर्विकासाच्या प्रकल्पात झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्याबाबत

**(१) * १५२०१ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुर्ला महानंदानगर (मुंबई) येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पात झालेल्या भ्रष्टाचाराबाबत तत्कालीन गृहनिर्माण मंत्री यांनी या प्रकल्पाची चौकशी करण्यासाठी त्रिसदस्यीय समिती गठीत करुन चौकशीचे आदेश दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीमार्फत प्रकल्पाच्या परिशिष्ट-२ च्या सर्वेक्षणाच्या संदर्भात जो गैरप्रकार झाला आहे त्याची योग्य प्रकारे चौकशी झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गृहनिर्माण प्रकल्पातील सभासदांच्या तक्रारीनुसार slum Act १९७१ च्या Section २ (E) नुसार प्रत्येक झोपडीच्या ताबेधारकांची पात्रता निश्चित करण्यासाठी तरतूद असताना तसेच शासन निर्णय दिनांक १६/०५/२०१५ व शासन निर्णय दिनांक १८/०५/२०१८ यानुसार सभासद पात्र होत असतानाही विकासकाच्या संगनमताने म्हाडाचे संबंधित अधिकारी पात्रतेसंदर्भात सभासदांना नाहक त्रास देत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषी अधिकाऱ्यांवर व विकासकांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सदर समितीची कार्यकक्षा केवळ इमारतीच्या बांधकामात झालेल्या अनियमिततेची चौकशी करणे अशी होती. परिशिष्ट-२ च्या सर्वेक्षणाच्या संदर्भात झालेल्या गैरप्रकाराची चौकशी करणे समितीच्या कार्यकक्षेत येत नव्हते.

(३) कुर्ला महानंदा सह.गृह.संस्थेमधील झोपडीधारकांची पात्रता सन १९९५ च्या मतदार यादीनुसार व पी.एम.जी.पी. प्रकल्पाच्या श्रेणीवाढ योजनेंतर्गत सदर संस्थेसोबत केलेल्या भाडेपट्टा करारनाम्यानुसार निश्चित करण्यात आलेली आहे. म्हाडाच्या मुंबई मंडळाकडून पाठविण्यात आलेल्या परिशिष्ट-२ मध्ये एकूण ११५ झोपडीधारक असून म्हाडाच्या जमिनीवर १०९ झोपडीधारक पात्र असल्याचे दिसून येते. सदर परिशिष्ट-२ मध्ये म्हाडाच्या जमिनीवरील सर्व १०९ झोपडीधारक पात्र असल्यामुळे संस्थेतील झोपडीधारक पात्र होत असतानाही विकासकाच्या संगनमताने म्हाडाच्या संबंधित अधिकाऱ्यांकडून पात्रतेच्या संदर्भात सभासदांना नाहक त्रास देण्याची बाब वस्तुस्थितीला धरुन नाही.

(४) आय.आय.टी. पवई यांच्या स्ट्रक्चरल ऑडिट रिपोर्ट मध्ये सुचविलेल्या दुरुस्त्या ६ महिन्यांच्या आत करण्याबाबत समितीने शिफारस केली होती. त्यानुसार कार्यवाही करण्याबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास कळविण्यात आले आहे. याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विदर्भातील शेतकऱ्यांना कृषि पंप मिळण्यास विलंब होत असल्याबाबत

**(२) * १६१८३ श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील शेतकऱ्यांची नवीन कृषि पंप आणि विद्युतीकरणाची कामे बंद असून मोठ्या रकमेच्या निविदेमुळे शेतकऱ्यांना कृषि पंप मिळण्यास अडचणी येत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील दोन वर्षांपासून दरसूचीत वाढ झाली नसून कृषि पंप बसवण्याच्या कामात अडचणी येत असून सदरहू दरसूचीत वाढ करण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, लहान रकमेच्या निविदा प्रकाशित केल्यास शेतकऱ्यांना मिळणारे कृषि पंप वेळेत मिळतील त्याबाबत लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासन याबाबत सकारात्मक निर्णय घेणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

महावितरणव्दारा विदर्भातील विविध मंडळातील कामाकरीता प्रसिध्द करण्यात आलेल्या निविदांना योग्य प्रतिसाद मिळाला असून जेथे कमी प्रतिसाद तेथे कामे न थांबविता कोटेशन तत्त्वावर अथवा सूचीबध्द कंत्राटदाराकडून तसेच बेरोजगार सुशिक्षित अभियंत्यांकडून कामे करुन घेण्यात येत आहेत. सन २०२१-२२ मध्ये विदर्भातील २६,५०७ कृषि पंपांना तर सन २०२२-२३ मध्ये माहे नोव्हेंबर, २०२२ अखेर १५,१९० कृषि पंप वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत.

(२) महावितरण यांचे दिनांक १८/११/२०२२ च्या परिपत्रकानुसार दरसूचीत वाढ करण्यात आली आहे. त्यानुसार निविदांमध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

(३) हे खरे आहे.

(४) दरसुचीमध्ये वाढ झाल्याने नवीन दरसुचीनुसार सुचीबध्द कंत्राटदाराकडून कृषीपंपाचे ऊर्जीकरण वेळेत करुन घेण्याबाबतच्या सुचना महावितरणच्या मुख्य कार्यालयाकडून क्षेत्रिय कार्यालयांना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मालाड (मुंबई) येथील म्हाडाच्या जागेवर झालेल्या अतिक्रमणाबाबत

**(३) * १५१५२ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालाड (मुंबई) येथील दादासाहेब गायकवाड नगर येथील मालवणी बस आगाराजवळ म्हाडाच्या हजारो चौरस मीटर जमिनीवर अनधिकृतपणे भरणी टाकून बेकायदेशीररित्या लग्नाचा मंडप तयार करण्यात आला असल्याची बाब दिनांक २९ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक रहिवाशांनी म्हाडाकडे सात्तत्याने तक्रारी करूनही अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय;

(३) असल्यास, उक्त अनधिकृत बांधकाम प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे आणि सदरहू अनधिकृत बांधकामावर तातडीने निष्कासनाची कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे;

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) दादासाहेब गायकवाड नगर, मालवणी, मालाड (प.) येथील बेस्ट डेपोलगतचा “डी” १२९६० चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड महाराष्ट्र पोलीस को.ऑप.हौ. फेडरेशन यांना वितरीत करण्यात आला आहे. सदर भूखंडावर अनधिकृतपणे होत असलेले भराव टाकण्याचे काम म्हाडास निदर्शनास आल्यानंतर ते काम थांबविण्याबाबत संचालक, महाराष्ट्र पोलीस को.ऑप.हौ. फेडरेशन मर्यादीत यांना म्हाडाने त्यांच्या दिनांक १०/१०/२०२२ च्या पत्रान्वये कळविले आहे.

-----------------

## औरंगाबाद येथील क्रांती चौक पोलीस वसाहतीची दुरवस्था झाल्याबाबत

**(४) * १५३५२ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील क्रांती चौक पोलीस वसाहतीचे काम १९६३ मध्ये झाले असून तेथे १८० पोलीस कर्मचारी राहत असून औरंगाबाद सिडको टी.व्ही.सेंटर येथेही सन १९८० पासून पोलीस कर्मचारी राहत आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दोन्ही वसाहती ३० ते ३५ वर्षातच मोडकळीस आल्या असून सन २०१८ मध्ये या इमारतीच्या दुरुस्तीसाठी ७ कोटी रुपये खर्च करुनही त्या दुरावस्थेतच आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुलांना खेळण्यासाठी जागा नसून, इमारतीची दुरवस्था झालेली असून पोलीस कर्मचाऱ्यांना अत्यंत दयनीय अवस्थेत रहावे लागत आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन औरंगाबाद येथील पोलीस वसाहतींसाठी आवश्यक असणाऱ्या सोयी-सुविधा देण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) क्रांतीचौक पोलीस ठाणे येथील १८० निवासस्थान यापैकी३२ निवासस्थानांमध्ये पोलीस अंमलदार वास्तव्यास असून, १४८ निवासस्थाने ही जीर्ण आहेत. सदर पोलीस ठाणे येथील जुनी वसाहत पाडून नवीन ७८० सेवा निवासस्थाने बांधणेबाबतचा प्रस्ताव पोलीस गृहनिर्माण महामंडळ यांना सादर केलेला आहे.एन-१० सिडको, टी.व्ही. सेंटर येथील पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेच्या व पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रामीण यांच्या आस्थापनेवरील दुरुस्ती, जलनि:सारण व पिण्याच्या नळमार्ग, संरक्षण भिंत यांची दुरुस्ती करीता रुपये ६,२७,२०,०००/- इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. त्यानुषगांने रुपये ६,२७,२०,०००/- इतका निधी सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना प्राप्त झाला होता. त्यानुसार उक्त नमूद कामावर संपूर्ण निधी खर्च करण्यात आला असून, सदरचे काम हे भौतिकदृष्टया चांगल्या दर्जाचे पूर्ण झालेले आहे. तसेच सिडको, एन-१० टी.व्ही सेंटर येथे पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रामीण यांचे जागेमध्ये ६२९ निवासस्थाने यापैकी १४४ निवासस्थानांत अंमलदार वास्तव्यास असून, १३६ निवासस्थाने राहण्यास योग्य नाही व ३४९ निवासस्थाने रिक्त आहे.

(३) होय, हे खरे आहे.

सिडको, एन-१० टी.व्ही. सेंटर येथे पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रामीण यांचे जागेमध्ये मुलांना खेळण्यासाठी मोकळी जागा आहे.

(४) राज्यातील ३०६ पोलीस सेवा निवासस्थान प्रकल्पाच्या बांधकामास प्राधान्यक्रम ठरविण्याची कार्यवाही पोलीस महासंचालक कार्यालयाच्या स्तरावर सुरु आहे. सदर प्राधान्यक्रम यादीमध्ये पोलीस आयुक्त, औरंगाबाद येथे निवासस्थान तसेच पोलीस आयुक्त कार्यालयाची इमारत, मल्टीपर्पज हॉल, १०० पुरुष होस्टेल व ५० महिला होस्टेल, पोलीस मेस, आरपीआय मुख्यालय, हॉस्पीटल, ऑफीसर क्लब, वाचनालय, कवायत मैदान, कॅन्टीन इत्यादी बांधकामाचा समावेश करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बोकडवीरा (ता.उरण, जि.रायगड) गावाजवळ असलेल्या महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीच्या वायू विद्युत केंद्रात झालेला भीषण स्फोटाबाबत

**(५) * १६०९४ श्री.अंबादास दानवे, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.प्रसाद लाड, श्री.जयंत पाटील, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्रीमती उमा खापरे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोकडवीरा-उरण येथील महाराष्ट्र वीज निर्मिती कंपनीच्या वायु विद्युत केंद्रातील (जीटीपीएस) वीज निर्मितीच्या ए-२ युनीट मधील स्टीम बॉयलरचा दिनांक ९ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास स्फोट होऊन एक अभियंता व ३ कंत्राटी कर्मचाऱ्यांचे निधन झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त केंद्रातील बॉयलरचे २५ वर्षाने सर्वेक्षण करणे आवश्यक असताना त्याकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष केल्याने सदरहू घटना घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा प्रकारच्या दुर्घटना यापूर्वीही प्रकल्पात घडून अनेक कामगारांचा त्यामध्ये मृत्यू झाला असून अनेक जण गंभीररित्या जखमी झाल्याने या प्रकल्पाची सुरक्षा तसेच या प्रकल्पाशेजारील गावाची सुरक्षाही महत्वाची असल्याचे मत बोकडवीरा ग्रामपंचायतीचे माजी सरपंच यांनी व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने उक्त घटनेची चौकशी करण्यासाठी तज्ञ व्यक्तींची उच्चस्तरीय समितीची स्थापना करुन निधन झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना कायमस्वरुपी नोकरी व आर्थिक मदत देण्याबाबत व बॉयलरच्या दुरुस्तीकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करणाऱ्या अधिकारी कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदरचा अपघात दिनांक ०९/१०/२०२२ रोजी उरण ए-२ युनीटमध्ये घडलेला नसून वायू विद्युत केंद्रामधील बी-२ मध्ये झाला आहे. यात स्टीम बॉयलरचा स्फोट झालेला नसून बी-२ बॉयलरच्या बिसीपी पंपामध्ये बिघाड होऊन सदरची दुर्घटना घडली. त्यावेळी त्या क्षेत्रावर काम करत असलेल्या एक कनिष्ठ अभियंता, एक तंत्रज्ञ व एक कंत्राटी कामगार भाजले आणि तद्नंतर उपचारादरम्यान त्यांचे निधन झाले.
(२) व (३) बाष्पक अधिनियम, १९२३ व भारतीय बाष्पके विनियम,१९५० च्या तरतुदीनुसार प्रत्येक वर्षी होणाऱ्या निरीक्षण व जलदाब चाचण्या करण्यात आलेल्या आहेत. तसेच बाष्पकाच्या उर्वरित आयुष्याचे निर्धारण करण्याबाबत आवश्यक असणाऱ्या विहित सखोल चाचण्या या सन २०१५ व सन २०२० मध्ये करण्यात आल्या आहेत.सदर प्रकल्पामध्ये यापुर्वी कोणत्याही बाष्पकाचा अपघात घडलेला नाही. दिनांक ९ ऑक्टोबर, २०२२ रोजी घडलेला अपघात ह्या प्रकल्पातील बाष्पकाचा पहिला अपघात आहे.
(४) सदर घटनेची चौकशी करण्यासाठी महानिर्मिती कंपनीच्या मुख्य कार्यालयाकडून उच्चस्तरीय चौकशी समिती स्थापित करण्यात आली असून समितीकडून चौकशी करण्यात येत आहे. चौकशीअंती प्राप्त अहवालानुसार संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्याचे नियोजित आहे.

अपघातग्रस्त झालेले दिवंगत कनिष्ठ अभियंता यांच्या वारसास कायमस्वरुपी नियुक्ती ही त्यांचे वारसा हक्क प्रमाणपत्र देण्याच्या अधीन राहून देण्याचे नियोजित आहे. तसेच त्यांचे आर्थिक लाभ अंतर्गत भविष्य निर्वाह निधी, रजा रोखीकरण, गट विमा योजना, कामगार भरपाई रक्कम या रकमा अदा केल्या आहेत व त्यांचे सेवा उपदानाची रक्कम देण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच महानिर्मिती कायमस्वरुपी कर्मचारी तंत्रज्ञ-२ कर्मचारी यांच्या सेवापुस्तकात त्यांचे वडिलांचे नामनिर्देशन असल्याने त्याच्या पत्नीला वारसा हक्क प्रमाणपत्र वारसहक्क सादर करण्याबाबत महानिर्मितीने सूचना दिल्या आहेत. त्यांनी वारसा हक्क प्रमाणपत्र सादर केल्यानंतर त्यांचे देय आर्थिक लाभ देण्यात येतील. तसेच वारसा हक्क प्रमाणपत्र सादर केल्याच्या अधीन नोकरी देण्याबाबत नियोजन आहे.

दिवंगत कंत्राटी कामगार याला महानिर्मितीमार्फत आर्थिक मदत रुपये २ लाख देण्यात आली असून कर्मचारी व कंत्राट कामगार यांचे ऐच्छिक वर्गणीव्दारे रुपये ८ लाख रक्कम त्यांना अदा करण्यात आली आहे. त्यांच्या पत्नीस कंत्राटी तत्वावर दिनांक ११/११/२०२२ पासून नोकरीस रुजू करुन घेण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विविध जिल्ह्यात कार्यरत बोगस पोलीस उपनिरीक्षक आणि कर निरीक्षक यांचेवर कारवाई करण्याबाबत

**(६) * १६२४८ श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये कार्यरत ७ पोलीस उपनिरीक्षक आणि ७ कर निरीक्षक असे १४ प्रमुख पदावरील अधिकारी बोगस असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ च्या पहिल्या पंधरवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तलवारबाजी संघटनेच्या बोगस प्राविण्य प्रमाणपत्राचा आधार घेत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची दिशाभूल करून या अधिकाऱ्यांनी शासकीय नोकऱ्या हस्तगत केल्या असून बोगस प्राविण्य प्रमाणपत्राला संघटनेचे महासचिव यांनी स्वतःच्या स्वाक्षरीने प्रमाणपत्र सादर करीत या साऱ्यांची प्रमाणपत्रे सत्य असल्याचा दाखला दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासाठी त्यांनी चुकीचा मुद्रांक वापरून शासनाची फसवणूक केलेली आहे याचा अहवाल क्रीडा आयुक्त यांनी दिनांक ३० सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास पोलीस महासंचालक यांना पाठवलेला आहे, तसेच लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे याबाबत कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक १४/०६/२०२१ व दिनांक ३०/०६/२०२१ रोजीच्या पत्रान्वये शासनास व पोलीस महासंचालक यांना सादर केलेल्या अहवालानुसार एकूण १४ उमेदवारांची क्रीडा वैधता प्रमाणपत्र रद्द करण्यात आली असल्याने ते सदर क्रीडा वैधता प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय सेवेत खेळाडू आरक्षण अंतर्गत अर्हता पात्र ठरत नाहीत.

या प्रकरणी तलवारबाजी संघटनेचे पदाधिकारी श्री.अशोक दुधारे व अन्य श्री.तुषार चौधरी यांचे विरुध्द दिनांक २१/०८/२०२० रोजी गुन्हा दाखल केला आहे.

(४) आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य यांनी त्यांच्या अहवालामध्ये १४ उमेदवारांपैकी ७ उमेदवार हे पोलीस उपनिरीक्षक असल्याचे नमूद केले आहे. तथापि, सदर ७ उमेदवारांपैकी ५ उमेदवारांची नावे पोलीस उपनिरीक्षकाच्या सेवाजेष्ठता यादी व प्रशिक्षणास पाठविण्यात आलेल्या उमेदवारांच्या यादीमध्ये आढळून आली असून त्यापैकी ३ अस्थायी उमेदवारांना नोटीस बजाविण्यात आली आहे व २ स्थायी उमेदवारांविरुध्द प्राथमिक चौकशी व विभागीय चौकशी करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

तसेच आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य यांच्या अहवालामध्ये ७ उमेदवार हे कर निरीक्षक असल्याचे नमूद केले असले तरी,फक्त ४ उमेदवारांची राज्य कर निरीक्षक पदावर शिफारस करण्यात आली असून सदर उमेदवारांना वस्तु व सेवा कर विभागाकडून नियुक्ती देण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोकणातील मध्यम २२ धरण प्रकल्प अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याबाबत

**(७) * १५३९० श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील सुमारे २२ अपूर्ण सिंचन योजना गेली २० ते २२ वर्ष प्रलंबित आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्ह्यातील ५ प्रकल्प, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ७ प्रकल्प, रत्नागिरी जिल्ह्यातील ९ प्रकल्प व पालघर जिल्ह्यातील ३ प्रकल्प असे एकूण मध्यम २४ धरण प्रकल्प तर लघु १०० प्रकल्पांची कामे प्रलंबित आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रलंबित प्रकल्पात रायगड जिल्ह्यात महाडमधील कोथेरी, माणगावमधील कुंभे, कर्जतमधील कोंढाणे, अलिबागमधील सांबरकोंड, सारळभोर व पेणमधील बाळगंगा आणि हेटवणे, कुंभे या धरणात पाणी अडवण्यात आले असले तरी त्याचे कालवे व पाईपलाईनचे काम न झाल्याने शेतकऱ्यांना पाण्यापासून वंचित राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उर्वरित धरणांची ४० टक्के, १० टक्के कामे झाली असून, कोकण भागातील धरण, बंधारे यांचे प्रमाण अतिशय नगण्य असून हे प्रमाण कसे वाढविता येईल यासाठी अभ्यास, नियोजन आणि कठोर अंमलबजावणी करणे गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त जिल्हयांतील प्रकल्पांची कामे तात्काळ सुरु करण्याबाबत कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येणार आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

कोकण प्रदेशांतर्गत सद्य:स्थितीत जलसंपदा विभागांतर्गत ४ मोठे, १० मध्यम व ३६ लघु असे एकूण ५० प्रकल्प बांधकामाधीन आहेत. या व्यतिरिक्त कोकण प्रदेशांतर्गत ठेव तत्वावरील एकूण ९ प्रकल्प बांधकामाधीन आहेत. तसेच काळ-कुंभे हा एक जलविद्युत प्रकल्प बांधकामाधीन आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

जलसंपदा विभागांतर्गतच्या एकूण ५० प्रकल्पांपैकी रायगड जिल्ह्यात ८ प्रकल्प, सिंधुदूर्ग जिल्ह्यात १५ प्रकल्प, रत्नागिरी जिल्ह्यात १७ प्रकल्प, ठाणे जिल्ह्यात ४ प्रकल्प, पालघर जिल्ह्यात ५ प्रकल्प व नाशिक जिल्ह्यात १ प्रकल्प बांधकामाधीन आहे.

(३) नाही, हे खरे नाही.

बांधकामाधीन असलेल्या कोथेरी ल.पा.योजना, कुंभे जलविद्युत प्रकल्प, कोंढाणे पाणीपुरवठा प्रकल्प, बाळगंगा पाणीपुरवठा प्रकल्प व सांबरकुंड मध्यम प्रकल्प या प्रकल्पांमध्ये अद्याप पाणीसाठा करण्यात आलेला नाही.

हेटवणे मध्यम प्रकल्पामध्ये पूर्ण क्षमतेने पाणीसाठा झाला असून या प्रकल्पाच्या उजवा कालव्याचे किमी.क्र. ११ ते २० मधील मातीकाम व बांधकामे प्रगतीत आहेत. डावा कालवा – कि.मी १३-२७ पर्यंत आहे त्यापैकी १३-१८ कि.मी पर्यंत मातीकाम पूर्ण झालेले आहे. अशाप्रकारे कालव्याद्वारे एकूण ११५९ हेक्टर सिंचन क्षेत्र निर्मित झालेले आहे. उर्वरीत कामे बंदीस्त नलिका प्रणालिद्वारे प्रस्तावित असून त्याद्वारे ३१०९ हेक्टर सिंचन क्षेत्र निर्माण होणार आहे. हेटवणे मध्यम प्रकल्पाच्या कालव्यामधून सिंचनासाठी मागणीनुसार पाणी देण्यात येत आहे.

कोंढाणे पाणीपुरवठा व सारळभोर योजना ही जलसंपदा विभागाची नसून अनुक्रमे सिडको, नवी मुंबई व ग्रामविकास विभागाकडील आहे.

(४) प्रगतीपथावरील बांधकामाधीन प्रकल्प पूर्ण करण्याला प्राधान्य देण्यात आलेले असून त्यानंतर नवीन प्रकल्प हाती घेण्याचे प्रस्तावित करण्यात येईल.

(५) शासनाने पूढील दोन वर्षात पूर्ण करावयाच्या १०४ प्रकल्पांचा संपूर्ण राज्यासाठीचा कृती आराखडा तयार केला असून त्यात कोकण प्रदेशाच्या अखत्यारितील १ मोठा (तिलारी), ५ मध्यम प्रकल्प (अर्जुना, गडनदी, अरुणा, देवघर, कोर्ले सातंडी), १८ लघु प्रकल्प (डोमीहिरा, अंबोली, देंदोनवाडी, पाली-भूतावली, नाधवडे, पवाळे, तरंदळे, कोथेरी, नामपाडा, ओटाव, तळेरे, हसोळ, ओझर, काक्येवाडी,शेलारवाडी, तळवट, बेर्डेवाडी, मुचकुंदी) अशा एकूण २४ प्रकल्पांचा समावेश आहे. सदर २४ प्रकल्पांच्या पूर्णत्वाने उर्वरीत असलेली एकूण ३६,१७१ हे. सिंचन क्षमता व एकूण ४४ द.ल.घ.मी. पाणीसाठा निर्मितीचे नियोजन आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भांडूप (मुंबई) येथील एल.बी.एस. मार्गावरील मालमत्तेवर बेकायदेशीर कब्जा केल्याबाबत

**(८) * १६२५३ श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भांडुप (मुंबई) येथील एल.बी.एस. मार्गावर असलेल्या श्री.मेघश्याम भेलसेकर यांच्या सिटी सर्व्हे क्र. ६०/१७ ते २५ मालमत्तेवर मातोश्री डेव्हलपर्स यांनी बेकायदेशीर कब्जा केल्याची बाब माहे ऑक्टोबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.भेलसेकर यांनी मा.मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मुंबई पोलीस उपायुक्त परिमंडळ-७ व स्थानिक पोलीस ठाण्यातही तक्रार दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

मौजे भांडूप येथील न.भू.क्र.६०, ६०/१ ते ७० या भूखंडावरील मातोश्री डेव्हलपर्स यांनी सादर केलेली झोपडपट्टी पुनर्वसन योजना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने स्वीकृत केली आहे. सदर भूखंडापैकी न.भू.क्र.६०/१७ ते २५ या १०६०.८० चौ.मी. इतक्या क्षेत्रफळाच्या मालमत्ता पत्रकावर श्रीमती सुमती भेलसेकर व श्रीमती सुशिला भेलसेकर यांची नांवे आहेत. श्रीमती सुशिला भेलसेकर यांनी Release Deed मार्फत मयत श्रीमती सुमती भेलसेकर यांचा मुलगा श्री.जिवन भेलसेकर यांना मालमत्ता अधिकार दिल्याचे दिसून येते. श्री.जिवन भेलसेकर यांनी सदर भुखंडाचे विकास हक्क (Development Rights) उपरोक्त झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे विकासक मे.मातोश्री डेव्हलपर्स यांना दिलेले आहेत.

तथापि, मालमत्ता पत्रक (P.R.Card) अद्ययावत झालेले नसल्याने योजनेच्या विक्री घटकाच्या बांधकामास परवानगी देण्यात आलेली नाही, असे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने कळविले आहे.
(२) हे खरे आहे.
(३) श्री.भेलसेकर यांनी दिनांक १७ ऑक्टोबर, २०२२ रोजी पोलीस उपायुक्त परिमंडळ-७, मुंबई शहर यांना दिलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने पुढील चौकशी करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यामध्ये अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या गुन्हेगारांवर कारवाई करण्याबाबत

**(९) * १५२५३ श्री.महादेव जानकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, ॲड.अनिल परब, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उरण (जि.रायगड) येथील जेएनपीटी बंदरातून पोलिसांच्या शाखेने ३४५ किलो व मुंबई विमानतळावर ८० कोटीचे हेरॉईन जप्त केले असून राज्यात विविध ठिकाणी अंमली पदार्थाची तस्करी होत असल्याचे नुकतेच माहे सप्टेंबर व ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एनसीबी ने जूनमध्ये केलेल्या कारवाईत २५०० कोटींचे हेरॉईन जप्त केले तर जुलै महिन्यात १६ कोटींचे अंमली पदार्थ आणि सप्टेंबर मध्ये केलेल्या कारवाईत १३ कोटींचे कोकेन जप्त केले असून गेल्या तीन महिन्यांत तब्बल ४ हजार कोटी रुपयांचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात विविध मार्गांनी मोठ्या प्रमाणावर अंमली पदार्थाची तस्करी होत असून मीरा-भाईंदर, वसई-विरार परिसरात ११७ अंमली पदार्थ सेवन करणाऱ्या व विक्री करणाऱ्या तस्करांना पोलीस कारवाईत अटक केली आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यामध्ये अंमली पदार्थाची तस्करी करणाऱ्या किती गुन्हेगारांना अटक करण्यात आली आहे व राज्यातील तरुण वर्ग अंमली पदार्थाच्या आहारी जात असल्याने अंमली पदार्थाच्या तस्करीला आळा घालण्यासाठी शासनाने कोणती सक्षम यंत्रणा वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) उक्त प्रकरणी अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या गुन्हेगारांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) दिनांक १४/०७/२०२२ रोजी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयांतर्गत गुन्हे शाखेने केलेल्या कार्यवाहीत पनवेल येथे ७२.५१८ कि.ग्रॅ. वजनाचा रुपये ३६२.५९ कोटी इतक्या किंमतीचा हेरॉईन हा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे. सदर प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे ६ आरोपींविरूध्द एन.डी.पी.एस. कायदा, १९८५ च्या कलम ८(क), २२(क), २३(क), २९ अन्वये गु.र.क्र.१६०/२०२२ नोंदविण्यात आला आहे. सद्य:स्थितीत सर्व आरोपी न्यायालयीन कोठडीत असून गुन्ह्याचा तपास सुरू आहे.

मुंबई विमानतळावरील कार्यवाही महसूल गुप्तचर संचालनालय या केंद्र शासनाच्या अखत्यारीतील संस्थेने केली आहे.

(२) एनसीबी ने जून, २०२२ मध्ये हेरॉईन जप्तीचा कोणताही गुन्हा दाखल केलेला नाही. एनसीबी ने जुलै, २०२२ मध्ये केलेल्या कारवाईत एका प्रकरणी १९० किलो गांजा जप्त केला आहे. तसेच सप्टेंबर, २०२२ मध्ये ३.२ किलो कोकेन जप्त केले आहे. सप्टेंबर-ऑक्टोबर, २०२२ मध्ये अंदाजे ४१०४.५८९ किलो वजनाचे अंमली पदार्थ जप्त केले आहेत.

(३) मीरा-भाईंदर, वसई-विरार परिसरात अंमली पदार्थ सेवन करण्याबाबत एकूण ४९५ गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यामध्ये ५७८ आरोपींना अटक करण्यात आली आहे. अंमली पदार्थ विक्री / तस्करीबाबत एकूण ७०१ गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यामध्ये ७९९ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

(४) व (५) राज्यात सन २०२२ मध्ये (ऑक्टोबर, २०२२ पर्यंत) अंमली पदार्थ कायद्यांतर्गत अंमली पदार्थांच्या सेवनाबाबत एकूण ९५३० गुन्हे दाखल करण्यात आले असून ९७०० आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच अंमली पदार्थ ताब्यात बाळगणे/वाहतूक करण्याबाबत एकूण १५३० गुन्हे दाखल झाले असून २०१३ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

राज्यात अंमली पदार्थांच्या व्यापारास व प्रसारास आळा घालण्यासाठी सर्व पोलीस घटकांमध्ये स्वतंत्र अंमली पदार्थ विरोधी कक्ष स्थापन केलेला आहे. अपर पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची अंमली पदार्थांबाबतचे "समन्वय अधिकारी" म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. राज्यामध्ये ॲन्टी नार्कोटीक्स टास्क फोर्सची स्थापना करण्यात आली आहे. तसेच केंद्र शासनाच्या दिनांक २५/०३/२०२२ च्या आदेशानुसार अंमली पदार्थांवर आळा घालण्यासाठी राज्यस्तरीय नार्को कोऑर्डीनेशन समिती व जिल्हा स्तरावर जिल्हास्तरीय नार्को कोऑर्डीनेशन समितीची स्थापना करण्यात आली असून सदर समित्यांकडून अंमली पदार्थांवर आळा घालण्याबाबत वेळोवेळी आढावा घेतला जातो.

-----------------

## नौपाडा (ठाणे) येथील विद्यार्थीनीचा रिक्षा चालकाने विनयभंग केल्याबाबत

**(१०) * १६०७४ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नौपाडा (ठाणे) येथील ११ वीत शिक्षण घेत असलेली विद्यार्थीनी महाविद्यालयात जाण्यासाठी घरातून निघाली असता मध्यवर्ती बाजारपेठेत रिक्षा चालकाने विद्यार्थीनीचा विनयभंग केल्याची घटना दिनांक १४ ऑक्टोबर, २०२२ रोजी सकाळी घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यार्थीनीने त्याला प्रतिकार करताच रिक्षाचालकाने तिला फरफटत नेल्याने ती गंभीर जखमी झाली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने याप्रकरणातील आरोपी रिक्षाचालकास अटक करुन त्याच्यावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय. प्रस्तुत प्रकरणी ठाणेनगर पोलीस स्टेशन जि.ठाणे येथे गु र नं १८४/२०२२ भादंवि ३५४, ३५४(अ), ३३६, २७९ सह मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे दिनांक १४/१०/२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.
(२) विद्यार्थीनीने आरोपीस प्रतिकार करताच रिक्षा चालकाने तिला फरफटत नेल्याने किरकोळ दुखापत झालेली आहे.
(३) सदर गुन्ह्यातील आरोपीस दिनांक १५/१०/२०२२ रोजी अटक करण्यात आले आहे. आरोपी याचेवर दिनांक ०१/११/२०२२ रोजी सीआरपीसी कलम १०७ प्रमाणे चॅप्टर केस करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तुळजाई गृहनिर्माण संस्था बोरीवली (मुंबई) येथील उद्वाहनात अडकून ज्येष्ठ नागरिकाला प्राण गमवावे लागल्याची दुर्देवी घटना घडल्याबाबत

**(११) * १५५११ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोरीवली (मुंबई) येथील तुळजाई गृहनिर्माण संस्थेतील सदोष उद्वाहनात (लिफ्टमध्ये) अडकून एका ज्येष्ठ नागरिकाला प्राण गमवावे लागले असल्याची दुर्देवी घटना दिनांक १२ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त अपघाताची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे आणि उक्त घटनेत हलगर्जीपणा करणाऱ्या उद्वाहनाची देखभाल-दुरुस्ती करणाऱ्या कंपनीसह तपासणी करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

सदर घटना दिनांक २ ऑक्टोबर, २०२२ रोजी घडलेली आहे.

(२) सदर अपघाताची चौकशी ऊर्जा विभागाच्या अधिपत्याखालील विद्युत निरीक्षणालयातील विद्युत निरीक्षक, उद्वाहन, मुंबई यांच्या कडून झालेली असून चौकशी दरम्यान असे निदर्शनास आले की, मे.आदित्य इलेव्हेटर यांचे कडून ८ प्रवासी क्षमतेच्या उभारणी केलेल्या उदवाहनाची देखभाल व दुरुस्ती ही मे.आदित्य इलेव्हेटर यांच्याकडे होती.

सदर उद्वाहनाच्या मोटारीला होल्ड करण्याकरीता असलेल्या ब्रेक मधील स्प्रीगंचा दबाव अचानक कमी झाल्यामुळे (Spring Compression) ब्रेक निकामी झाल्याने उद्वाहन अनियंत्रित होऊन खालच्या दिशेने सुरु झाले व त्यामुळे सदर अपघात घडला.

उद्वाहनाच्या मोटारीचे ब्रेक कॅलिब्रेशन पडताळणी योग्यरित्या न झाल्यामुळे सदरहू अपघात घडला आहे. मे.आदित्य इलेव्हेटर्स यांनी महाराष्ट्र उद्वाहन नियम, १९५८ मधील नियम क्र. ६(६) अन्वये उद्वाहनाची योग्यरित्या देखभाल व दुरूस्ती न राखल्यामुळे अपघात झाला असल्याने या घटनेबाबतचा अभिप्राय कस्तुरबा पोलीस ठाणे, बोरीवली (पूर्व) यांना कळविण्यात आलेला असून मे.आदित्य इलेव्हेटर्स यांच्यावर भा.दं.सं. ३०४ (अ) अन्वये पोलीसांमार्फत गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे.

उपरोक्त उद्वाहनाचे वार्षिक निरीक्षण माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये विद्युत निरीक्षक, उद्वाहन यांच्या कार्यालयातील संबंधित सहाय्यक अभियंता श्रेणी-२ यांच्याकडून करण्यात आले होते. त्या कालावधीमध्ये उद्वाहन सुरक्षित कार्यान्वित होते. तद्नंतर कोविड-१९ च्या पार्श्वभुमीवर असलेल्या प्रवेश/प्रवास निर्बंधामुळे तसेच अपुऱ्या मनुष्यबळामुळे उद्वाहनांची नियतकालिक निरीक्षणांचे उद्दिष्टे पूर्ण होऊ शकले नाहीत. तसेच सदर उद्वाहनाचे वार्षिक निरीक्षण सन २०२२-२३ मध्ये नियोजित होते. संबंधित जबाबदार अधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आदिवासी विकास विभागांतर्गत आश्रमशाळेतील उच्च माध्यमिक शिक्षकांच्या पदोन्नतीची प्रकरणे निकाली काढणेबाबत

**(१२) * १५८०२ श्री.बाळाराम पाटील, डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागांतर्गत असलेल्या आश्रमशाळांमध्ये सन २००१ पासून कार्यरत असलेल्या उच्च माध्यमिक शिक्षकांच्या पदोन्नतीची प्रकरणे तात्काळ निकाली काढणे संदर्भातील शासन परिपत्रक क्रमांक एस.आर.व्ही २०२२/ प्र.क्र.५/कार्या १२, दिनांक ९ मार्च, २०२२ हे सर्व प्रशासकीय विभागांस निर्गमित करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,आदिवासी विकास विभागांतर्गत असलेल्या आश्रमशाळांमध्ये गेल्या २१ वर्षांपासून बी.एड, नेट सेट, एम.फील व पीएचडी अशी अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांना पदोन्नतीचे सर्व निकष पूर्ण करीत असूनही पदोन्नती देण्यात आली नाही हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त शिक्षकांनी त्यांच्याकडे पदोन्नतीबाबत उच्च अर्हता व २१ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव असूनही शासनाकडे वारंवार निवेदने करूनही त्यांना पदोन्नती न दिल्याने आता ते पदोन्नतीविना पुढील वर्षी सेवानिवृत्त होत आहेत हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आदिवासी विकास विभागांतर्गत असलेल्या आश्रमशाळांमध्ये सन २००१ पासून कार्यरत असलेल्या उच्च माध्यमिक शिक्षकांच्या पदोन्नतीची २१ वर्षांपासून प्रलंबित असलेली प्रकरणे निकाली काढणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) आदिवासी विकास विभागातील उच्च माध्यमिक शिक्षक या संवर्गाचे सेवा प्रवेश नियम अस्तित्वात नसल्याने उच्च माध्यमिक शिक्षक संवर्गात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती देता आली नाही.
(४) आश्रमशाळेतील उच्च माध्यमिक शिक्षकांचे सेवा प्रवेश नियम तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंबडवे (ता.मंडणगड, जि.रत्नागिरी) या मूळ गावी न्यायालय स्थापन करण्याबाबत

**(१३) * १६०५८ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंबडवे (ता.मंडणगड, जि.रत्नागिरी) या मूळगावी न्यायालय स्थापन करावे असे मा.उच्च न्यायालयाने राज्य शासनास दिनांक २४ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास पत्र पाठविले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यासंदर्भात न्यायालय कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष आणि कोर्ट मॅनेजर यांनी मा.उद्योग मंत्री व मा.जिल्हापालक मंत्री, रत्नागिरी जिल्हा यांची त्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत भेट घेतल्यावर निधी मंजूरीकरीता जिल्हा नियोजन समितीसमोर मान्यतेसाठी प्रस्ताव ठेवण्याबाबत जिल्हा पालक मंत्र्यानी मा.जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना आदेशित केले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने न्यायालयीन इमारत उभारणीसाठी किती खर्च अपेक्षित आहे तसेच जिल्हा नियोजन समितीने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच मा.न्यायाधिश लघुलेखक (स्टेनोग्राफर) व इतर २५ कर्मचाऱ्यांची पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, मा.उच्च न्यायालयाकडुन मंडणगड तालुक्यात दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग हे न्यायालय स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक २२/०९/२०२२ च्या पत्रान्वये प्राप्त झाला आहे.

(२) होय, मंडणगड, जि.रत्नागिरी येथे उपरोक्त न्यायालय स्थापन करणेसंदर्भात कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष आणि कोर्ट मॅनेजर यांनी मा.उद्योग मंत्री व मा.जिल्हापालक मंत्री, रत्नागिरी जिल्हा यांची भेट घेतली होती.

मंडणगड येथील प्रस्तावित न्यायालयाकरीता भाड्याने घेण्यात येणाऱ्या जिल्हा परिषद, रत्नागिरी यांच्या अखत्यारितील मौजे भिंगळोली, ता.मंडणगड येथील बहुउद्देशीय हॉल (Activity Center) च्या दुमजली इमारतीमध्ये अंतर्गत बदल करण्याकरीता येणाऱ्या रुपये २८.१० लाख इतक्या खर्चास जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी यांनी मान्यता दिली असून त्यापैकी रुपये १४.०० लाख रकमेचे वितरण करण्यात आले आहे.

(३) मंडणगड येथील प्रस्तावित दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग या न्यायालयाकरीता इमारत उभारणीबाबतचा प्रस्ताव शासनास अद्याप प्राप्त झाला नाही.

मंडणगड येथील प्रस्तावित न्यायालय स्थापन करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील विक्रमगड पोलीस ठाण्याच्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या निवासी इमारतींची पुनर्बांधणी करण्याबाबत

**(१४) * १५१९७ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील विक्रमगड पोलीस ठाणे १९४७ पासून कार्यरत असून सदरहू पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचाऱ्यांसाठी बांधण्यात आलेल्या निवासस्थानाच्या इमारती या जवळजवळ ७० वर्षे जुन्या असून सद्य:स्थितीत अत्यंत जीर्ण, धोकादायक झाल्या असल्याने सदरहू निवासस्थानात राहणाऱ्या पोलीस कर्मचारी व त्यांचे कुटुंबियांना जीव मुठीत धरून राहावे लागत आहेत तर काही कर्मचारी मुख्यालय सोडून दूरच्या ठिकाणी राहत आहे, हे खरे आहे काय,

(२) सदरहू पोलीस कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाच्या इमारतीची पुनर्बांधणी करण्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव सन २०१६ साली शासनाकडे सादर करण्यात आलेला असतानाही या प्रस्तावासंदर्भात शासनाने आजमितीस कोणताही निर्णय घेतलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विक्रमगड पोलीस स्टेशनमध्ये कार्यरत असलेल्या पोलीस अधिकारी तसेच पोलीस कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाच्या इमारतीची विनाविलंब पुनर्बांधणी करण्याचे काम हाती घेवून लवकरात लवकर पूर्ण करण्याचेदृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) विक्रमगड पोलीस ठाणे अंतर्गत ०१ अधिकारी व २७ अंमलदार यांचे निवासस्थान उपलब्ध आहेत, पैकी ०१ अधिकारी व ०५ अंमलदार यांची निवासस्थाने सुस्थितीत आहेत. उर्वरित २२ निवासस्थाने नादुरूस्त असल्याने रिक्त आहेत.

(२) व (३) पालघर पोलीस घटकातील विक्रमगड पोलीस ठाणे करीता विक्रमगड पोलीस ठाणे व पोलीस अधिकारी/कर्मचारी निवासस्थाने इमारतीचे बांधकामाबाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक, पालघर यांनी पोलीस महासंचालक यांच्याकडे सादर केला आहे.

राज्यातील पोलीस सेवा निवासस्थान प्रकल्पाच्या बांधकामास प्राधान्यक्रम निकष ठरविण्याची कार्यवाही पोलीस महासंचालक स्तरावर सुरू आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार प्राधान्यक्रमाने बांधकामाची पुढील कार्यवाही महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण महामंडळ मर्या. मार्फत करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कर्नाटक शासनाने अलमट्टी धरणाची उंची वाढविल्यास सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील शेकडो गावांवर होणाऱ्या विपरीत परिणामाबाबत

**(१५) * १५३६६ श्री.अरुण लाड : तारांकित प्रश्न क्रमांक १४१३९ ला दिनांक २२ ऑगस्ट, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्नाटक शासनाने अलमट्टी धरणाची उंची ५२४ मीटरपर्यंत वाढविण्याचा निर्णय घेतल्यामुळे सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील शेकडो गावांवर विपरीत परिणाम होणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अलमट्टी धरणाच्या बॅकवॉटरमुळे कोल्हापूर व सांगली शहरातील कृष्णा व पंचगंगा नद्यांना पूर येत असून हानी होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जलसंपदा विभागाने निर्णय क्रमांक पूरनि २०२१/प्र.क्र.२७५/२०२१/सिव्य(म) दिनांक १२/१०/२०२१ अन्वये कृष्णा पूर अभ्यास समितीने (वडनेरे समिती) दिनांक २७ मे, २०२० रोजी सादर केलेल्या अहवालातील स्वीकृत व अंशत: स्वीकृत शिफारशीच्या अंमलबजावणीसाठी विविध यंत्रणांना अवगत करण्यात आले असून आवश्यक कार्यवाही सुरु आहे, हे ही खरे आहे काय ,

(४) असल्यास, त्या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पूर नियंत्रणाबाबत काय उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे, तसेच कर्नाटक शासनाशी समन्वय साधून कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही. शासनामार्फत भिमा व कृष्णा खोऱ्यात सन २०१९ मध्ये उद्भवलेल्या पूर परिस्थितीची कारणे शोधणे व भविष्यकालीन उपाययोजना सुचविणेसाठी सेवानिवृत्त प्रधान सचिव श्री.वडनेरे यांचे अध्यक्षतेखाली नेमलेल्या अभ्यास समितीने सादर केलेल्या अहवालामध्ये अलमट्टी, हिप्परगी धरण हे सांगली, कोल्हापूर जिल्ह्यातील पूरपरिस्थिती निर्माण होण्यासाठी कारणीभूत ठरत नसल्याचे नमूद केले आहे.

(३) हे खरे आहे.

(४) वर नमूद श्री.वडनेरे, निवृत्त प्रधान सचिव यांचे अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने सुचविलेल्या शिफारशी/उपाययोजनांच्या अनुषंगाने सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील पूरविषयक उपाययोजनांच्या कामांच्या प्राथमिक प्रकल्प अहवालास जागतिक बँक अर्थसहाय्य मिळणेबाबत कार्यवाही प्रगतीत आहे.

(५) i) वर नमूद श्री.वडनेरे, निवृत्त प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने सुचविलेल्या शिफारशी/उपाययोजनांच्या अनुषंगाने सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील पूरविषयक उपाययोजनांच्या कामांच्या प्राथमिक प्रकल्प अहवालास जागतिक बँक अर्थसहाय्य मिळणेबाबत कार्यवाही प्रगतीत आहे.

ii) कर्नाटक शासनाशी समन्वय साधण्यासाठी दोन्ही राज्यांची त्रिस्तरीय समिती स्थापन करण्यात आली असून पूर विषयक माहितीचे आदानप्रदान करण्यात येवून पूर नियंत्रणाबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चिमणगांव, जरंडेश्वर (ता.कोरेगाव, जि.सातारा) व कन्नड (औरंगाबाद) येथील साखर कारखान्यांसाठी बनावट कंपन्यांनी आर्थिक व्यवहार केल्याबाबत

**(१६) * १५७६६ प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, अ‍ॅड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य सहकारी बँकेच्या २५ हजार कोटींच्या गैरव्यवहाराप्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेने परिसमाप्ती (क्लोजर) अहवाल सादर केल्यानंतरही सदर प्रकरणात चिमणगांव, जरंडेश्वर (ता.कोरेगाव, जि.सातारा) व कन्नड (औरंगाबाद) येथील साखर कारखान्यांसाठी बनावट कंपन्यांनी आर्थिक व्यवहार केल्याचे निदर्शनास आल्यानंतर फेरतपास करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बनावट आर्थिक व्यवहार करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) सदर प्रकरणात माता रमाबाई आंबेडकर पोलीस स्टेशन, मुंबई येथे दिनांक २६/०८/२०१९ रोजी गु.र.नं. २२४/२०१९ कलम ४०६,४०९,४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १२० (ब) भा.दं.वि.सं. सह लाचलुचपत प्रतीबंधक कायदा १९८८ कलम १२(१)(ब) व १३(१)(क) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हा गु.र.नं. ७८/२०१९ अन्वये आर्थिक गुन्हे विभाग मुंबई येथे वर्ग करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यात दखलपात्र गुन्ह्याचे कृत्य आढळून न आल्याने दिनांक १०/०९/२०२० रोजी केस क्र. ८२१/एम.ए/२०२० अन्वये ‘सी’ समरी अंतिम अहवाल मा.सत्र न्यायालयात सादर करण्यात आला होता.

तथापि, फिर्यादी यांनी मा.न्यायालयात सादर केलेल्या प्रोटेस्ट पिटिशन मधील मुद्दे व अंमलबजावणी संचालनालयाने (E.D.) पुरविलेली माहिती या आधारे सदर गुन्ह्यात सी.आर.पी.सी कलम १७३(८) प्रमाणे अधिकचा तपास करण्याच्या अनुषंगाने दिनांक १४/१०/२०२२ रोजी मा.विशेष न्यायालय,

मुंबई येथे आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई यांचेकडून अर्ज (PURSIS) दाखल करण्यात आला असून मा.न्यायालयाकडे मूळ कागदपत्रांची मागणी करण्यात आली आहे. त्याबाबत मा.न्यायालयाचा निर्णय प्रलंबित असून मा.न्यायालयाचा निर्णय प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(३) विलंब झालेला नाही.

-----------------

## पुणे येथे शासकीय कृषि महाविद्यालयाच्या जमिनी बेकायदेशीरपणे इतर लोकांनी ताब्यात घेतल्याबाबत

**(१७) * १५२९१ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) पुणे येथे शासकीय कृषि महाविद्यालयाच्या बऱ्याच जमिनी इतर लोकांनी बेकायदेशीरपणे ताब्यात घेतल्याबाबत, टीडीआरबाबत पुणे येथे बंड गार्डेन पोलीस स्टेशनमध्ये कृषि महाविद्यालय प्रशासनाने तक्रार दाखल केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासकीय कृषि महाविद्यालयाच्या जमिनी इतर लोकांनी बेकायदेशीरपणे ताब्यात घेणाऱ्यांवर व टीडीआरबाबत संबंधिताविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

तथापि, अशा आशयाबाबत खडकी पोलीस स्टेशन येथील स्थानिक अर्ज क्रमांक ९०/२०२२, दिनांक २८/०३/२०२२ रोजी अशा स्वरुपाचा तक्रार अर्ज प्राप्त असून यामध्ये गैरअर्जदारांनी कृषि महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे यांचे स.नं. ६२, बोपोडी, पुणे या जागेवर एक घरवजा कंटेनर क्रेनच्या सहाय्याने उतरविला त्यामुळे त्यांचेवर कायदेशीर कारवाई व्हावी वगैरे मजकूरचा तक्रार अर्ज सादर केला आहे.
(२) सदर तक्रारी अर्ज हा अर्जदार व गैरअर्जदार यांचेतील वादातीत मिळकती वरुन दाखल झालेला आहे. प्रकरणी चौकशी केली असता सदर बाब दिवाणी स्वरूपाची असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे पोलीस स्टेशनचा तक्रार अर्ज दप्तरी दाखल करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत नागपूर सुधार प्रन्यासने बांधलेल्या गाळयांना लागून असलेल्या नाल्याचे काम अपुर्णावस्थेत असल्याबाबत

**(१८) * १५४९२ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तरोडी खुर्द येथे प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत नागपूर सुधार प्रन्यासने बांधलेल्या २३७४ गाळयांच्या इमारतीला लागून असलेल्या एका नाल्याचे काम अर्धवट राहिल्यामुळे गाळे धारकांना आरोग्याचा त्रास होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यातील गाळे धारकांचे लीज डीड अजून पर्यंत न केल्यामुळे या रहिवाशांना त्रास होत असून नागपूर सुधार प्रन्यासच्या सभापतींनी गृहनिर्माण खात्याच्या प्रधान सचिवांच्या प्रस्तावानुसार मोजणी शुल्कात सवलत देऊन निवासी सदनिकांचे नोंदणी (पट्टा पंजीयन) करीता विक्रीपत्रास देय असलेले सवलतीचे मुद्रांक शुल्क रुपये १००० प्रमाणे करण्याची परवानगी देण्यात यावी असा प्रस्ताव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अजूनपर्यंत शासनाच्या वतीने कोणताच निर्णय न घेतल्यामुळे संबंधित लाभार्थ्यांना सदर सदनिकांचे नोंदणी (पट्टा पंजीयन) करून घेणे शक्य होत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) नागपूर सुधार प्रन्यासच्या जागेवर मौजा तरोडी (खुर्द) खसरा क्र.६२ व ६३ येथे ३३१६ सदनिका बांधण्यात आल्या आहेत. त्यापैकी खसरा क्र.६३ येथील २३७४ सदनिकांच्या लगत असलेल्या नाल्याच्या बाजूला संरक्षण भिंतीचे बांधकाम पूर्ण झाले असल्यामुळे तेथील गाळे धारकांना कोणताही त्रास नाही.
(२) होय.
(३) प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गट प्रवर्गातील लाभार्थ्यांना निवासी सदनिकांच्या भाडेपट्ट्यांच्या दस्तांना व नागपूर सुधार प्रन्यासच्या जागेवरील झोपडपट्टीवासीयांना वाटप केलेल्या भूखंड पट्टयांच्या दस्तांना मुद्रांक अधिनियमातील तरतूदीनुसार आकारणी योग्य असलेले मुंद्राक शुल्क कमी करुन रुपये १०००/- इतके मुद्रांक शुल्क करण्याचा प्रस्ताव मा.मंत्रीमंडळाच्या विचारार्थ सादर करण्यात आला आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## प्रधानमंत्री आवास योजना आणि मुख्यमंत्री गृहनिर्माण योजनांच्या अंमलबजावणीबाबत

**(१९) * १५८५२ श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील प्रत्येक गरिबाला हक्काचे घर मिळावे याकरीता केंद्र शासनाने सुरू केलेल्या प्रधानमंत्री आवास योजना आणि मुख्यमंत्री गृहनिर्माण योजनांच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने मागील दोन ते तीन वर्षात एकही बैठक झाली नसल्याने हजारो गरीब गरजू सामान्य जनता हक्काच्या घरापासून वंचित असल्याची बाब आहे माहे ऑक्टोबर, २०२२ च्या तिसऱ्या आठवड्यात व त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजनांचा तात्काळ आढावा बैठक घेऊन प्रधानमंत्री आवास योजना आणि मुख्यमंत्री गृहनिर्माण योजनांचा लाभ राज्यातील नागरिकांना देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) या विभागामार्फत प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) राबविण्यात येते. मुख्यमंत्री गृहनिर्माण योजना या विभागामार्फत राबविण्यात येत नाही.

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) च्या अनुषंगाने केंद्र स्तरावर तसेच राज्यस्तरावर वेळोवेळी बैठका आयोजित करण्यात येतात. त्यामुळे प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत तीन वर्षात एकही बैठक झाली नाही ही बाब वस्तुस्थितीवर आधारित नाही.

(२) प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत केंद्र शासनाचे प्रती लाभार्थी रूपये १.५० लक्ष व राज्य शासनाचे रूपये १.०० लक्ष इतके अनुदान देण्यात येते. या व्यतिरिक्त प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत खालीलप्रमाणे सवलती देण्यात येतात.

(१) आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील व अल्प उत्पन्न गटातील लाभार्थ्यांसाठीच्या गृहनिर्माण प्रकल्पांसाठी उपलब्ध असलेली शासकीय जमीन रुपये १/- प्रती चौ.मी. या दराने दिली जाते.

(२) आर्थिकदृष्टया दुर्बल घटक तसेच अल्प उत्पन्न गटातील लाभार्थ्यांसाठीच्या गृहप्रकल्पांना मोजणी शुल्कामध्ये ५०% सवलत दिली जाते.

(३) आर्थिकदृष्टया दुर्बल घटक तसेच अल्प उत्पन्न गटातील लाभार्थ्यांच्या सदनिकेच्या पहिल्या दस्तासाठी रुपये १०००/-इतके मुद्रांक शुल्क निश्चित करण्यात आले आहे.

(४) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदणीकृत कामगारांकरीता "महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजना" अंतर्गत पात्र कामगारांना केंद्र व राज्य सरकारकडून मिळणाऱ्या अनुदाना व्यतिरिक्त महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळाकडून प्रती लाभाथी रुपये २ लक्ष इतके अतिरिक्त अनुदान देण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## प्रभादेवी (मुंबई) येथील पोलीस ठाण्याबाहेर गोळीबार केल्याची घटना घडल्याबाबत

**(२०) * १६१७४ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील प्रभादेवी येथील पोलीस ठाण्याबाहेर राजकीय पक्षाच्या लोकप्रतिनिधींने पिस्तुलाचा धाक दाखवून गोळीबार केल्याची घटना दिनांक ११/०९/२०२२ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित लोकप्रतिनिधींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) उक्त प्रकरणी दादर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.५७१/२०२२, कलम १४३, १४४, १४५, १४७, १४८, १४९, ३३६, १८६, ५०४, ५०६ भादंविसह कलम ३/२५ भारतीय हत्यार कायदा सह कलम ३७(१), १३५ मपोका नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, सदर गुन्हयाचा तपास चालु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील गुन्हेगारांवर "महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा" लावण्याबाबत

**(२१) * १६३२२ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डोंबिवली (जि.ठाणे) येथील कुख्यात गुंडावर २० ते २२ गुन्ह्यांची पोलीस ठाण्यात नोंद असून समाजात दहशत पसरवणे, प्राणघातक शस्त्राचा धाक दाखविणे, अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्यामुळे पोस्को सारख्या गुन्हा नोंद असणे, खंडणी मागणे, आदि गुन्हे असतानाही अदयाप त्याच्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई झालेली नसल्याचे नुकतेच माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर व्यक्तीला दोन वेळा तडीपारी झालेली असून केवळ राजकीय नेते, पोलीस अधिकारी व गुंड लोकांशी संबंध असल्याने आजही त्याच्यावर कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अनेकांकडे खंडणी मागितल्यामुळे एका केबल व्यावसायिकाने दिनांक १० सप्टेंबर, २०२२ रोजी रेल्वेसमोर आत्महत्या केल्याची घटना घडलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने गुंड संदिप गोपीनाथ माळी व त्यांच्या संपूर्ण टोळीविरुध्द "महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा" (मोक्का कायदा) लावण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, ठाणे शहर अंतर्गत सदर व्यक्ती विरुध्द वर्ष १९९८ पासून आजतागायत महात्मा फुले चौक पो.स्टे. येथे १, डोंबिवली पो.स्टे. येथे २, विष्णूनगर पो.स्टे. येथे २ व मानपाडा पो.स्टे येथे ९ अशा एकूण १४ गुन्ह्यांची नोंद आहे. आरोपीविरुध्द वेळोवेळी मानपाडा/डोंबिवली पोलीस ठाण्याकडून प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.
(२) सदर व्यक्ती विरुध्द पोलीस उप आयुक्त, परि.-३ ठाणे यांनी ठाणे, नवी मुंबई व रायगड या जिल्ह्यातून हद्पार करण्याबाबत निर्गमित केलेल्या दिनांक ३०/८/२०२१ रोजीच्या आदेशाविरुध्द सदर व्यक्तीने दाखल केलेल्या अपिलाच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी सदर हद्पारीचा आदेश दिनांक २०/१२/२०२१ रोजी रद्द केला. तथापि, आरोपीविरुध्द चॅ.के.क्र. २४/२०२२ अन्वये फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ११०(ई)(ग) अंतर्गत प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे.
(३) होय.

एका केबल व्यावसायिकाने दिनांक १० सप्टेंबर, २०२२ रोजी रेल्वेसमोर आत्महत्या केल्यामुळे ठाणे रेल्वे पोलीस स्टेशनमध्ये कलम ३०६, ३४ भा.दं.वि. प्रमाणे एकूण १५ आरोपींविरुध्द गु.र.क्र. १२६८/२२ दाखल करण्यात आला आहे.
(४) उपरोक्त गुन्ह्यात तपास चालू असून सदर आरोपी व इतर साथीदारांवर वर्ष १९९९ मध्ये मोक्का कायदा अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. तसेच सदर आरोपी व इतरांविरुध्द वेळोवेळी संबंधित पोलीस ठाण्याकडून प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने लाच घेताना पकडल्याबाबत

**(२२) * १६४३३ श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हा परिषदेचे प्राथ. शिक्षणाधिकारी यांना रुपये २५,०००/- ची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिनांक २ नोव्हेंबर २०२२ रोजी वा त्यासुमारास पकडले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी विशेष न्यायालयाने त्यांना ३ दिवस पोलीस कोठडी सुनावली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील माटुंगा येथील महिला आश्रम शाळेतील मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याबाबत

**(२३) * १६४७१ श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील माटुंगा येथील महिला आश्रम शाळेतील १५ वर्षीय मुलीवर दोन अज्ञात व्यक्तीने लैंगिक अत्याचार केल्याची घटना दिनांक २५ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने या प्रकरणातील आरोपींना अटक करून त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) सदर प्रकरणी आग्रीपाडा पोलीस स्टेशन, मुंबई येथे गु.र.न. ००/२०२२ अन्वये दिनांक २३/१०/२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.सदर गुन्हा माता रमाबाई आंबेडकर पोलीस स्टेशन हद्दीत असल्याने गु.र.न. ७९४/२०२२ कलम ३६३, ३७६(२)(आय), ३७६(२), ३७६ (डी), ३७६ (ए), ३७६, ३७६(२)(क), ३४ भा द वि सह कलम ४, ६, ८, १२ बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम, २०१२ अन्वये दिनांक २४/१०/२०२२ रोजी गुन्हा वर्ग करण्यात आलेला आहे. नमूद गुन्ह्यामध्ये एकूण ०३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हा तपासाधीन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लातूर येथील बनावट कागदपत्रांच्या आधारे शासनाची फसवणूक करुन गुंठेवारी करणाऱ्या दोषींवर कारवाई करण्याबाबत

**(२४) * १६४८६ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर येथील शिवाजी नगर, पोलीस स्टेशन येथे गु.र.नंबर १७२/२०२२, १७३/२०२२, १७४/२०२२ नुसार कलम- ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१ भा.दं.वि. अन्वये सर्व्हे नंबर १४८ भु.क्र. २० पैकी घर क्र.R- ७/१२४५/१४/१, सर्व्हे नं १२५ भु. क्र.१२, १३, १४, १५, सर्व्हे नं ११४/ब/२ पैकी मौजे लातुर भु. क्र.१, २ पैकी घर क्र आर प्रकरणी गुन्हे दाखल झालेले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बनावट कागदपत्रे तयार करुन शासनाची फसवणुक करुन गुंठेवारी करण्यात आल्याचे गुन्हे दाखल असूनही सदरील प्रकरणी तपासात कोणतीही प्रगती नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी जबाबदार दोषी अधिकारी कर्मचारी व पोलीस संगनमताने सदरील प्रकरण दडपण्याचा प्रयत्न करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय हे खरे आहे.

आरोपींनी स्वत:च्या फायद्या करीता बनावट गुंठेवारी प्रमाणपत्र तयार करुन लातूर महानगरपालिकेची फसवणूक केल्याप्रकरणी शिवाजी नगर पोलीस स्टेशन, लातूर येथे दिनांक ०१/०४/२०२२ रोजी गु.र.नं १७२/२०२२, १७३/२०२२, १७४/२०२२ भा.द.वि कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(२), (३) व (४) सदर प्रकरणी लातूर महानगरपालिकेकडून फिर्याद दाखल करण्यात आली असल्याने तपासाच्या अनुषंगाने त्यांच्याकडून कागदपत्रे मागविण्यात आली आहेत.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास सरु आहे.
(५) विलंब झालेला नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील ३० ग्रामपंचायतीमधील वाड्यांना रस्त्याची सोय नसल्याबाबत

**(२५) * १६६८२ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील सुमारे ३० ग्रामपंचायतींच्या अंतर्गत येणाऱ्या ६५ वाड्यावस्त्यांमध्ये रस्त्यांची सोय नसल्याने ग्रामस्थ व रुग्णांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गर्भवती महिलांसह गंभीर रुग्णांना रस्त्याअभावी मोठ्या प्रमाणात अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, यासंदर्भात निर्णय घेऊन व निधीची तरतूद करुन येथील वाड्यावस्त्यांना जोडणारे रस्ते बनविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१), (२) व (३) राज्यातील काही दुर्गम आदिवासी भागामध्ये पुरेसे बारमाही रस्ते नसल्याने तेथील नागरिकांना होणाऱ्या गैरसोयीमुळे अशा अद्याप बारमाही रस्त्याने न जोडलेल्या वाड्या / पाडे यांना मुख्य रस्त्याशी जोडण्यासंदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्ह्यातील लहान मुले /अर्भके विक्री करणाऱ्या टोळीवर कारवाई करणेबाबत

**(२६) * १६८४९ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्ह्यातून परराज्यात बाळ विक्री करणारी टोळी कार्यरत असल्याची बाब दिनांक २२ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेल्या दहा महिन्यात दहा बाळांची विक्री केल्याची नोंद नागपूर पोलिसांकडे करण्यात आली असून सदर टोळीत बनावट डॉक्टर देखील सहभागी असून सदरील प्रकरणातील सर्व आरोपींना अटक करून पोलीस विभागामार्फत न्यायालयात सक्षमपणे बाजू मांडली गेली आहे काय, याप्रकरणात दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले आहे काय,
(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकरणास जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी व डॉक्टर यांच्यावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) नागपूर शहर पोलीस आयुक्तालयांतर्गत माहे नोव्हेंबर, २०२२ अखेर विविध पोलीस ठाण्यात बाळविक्री/बेकायदेशीर दत्तक दिल्याबाबत एकूण ११ गुन्हे नोंद आहेत.

नागपूर ग्रामीण घटकात अशा प्रकारची घटना घडल्याची तक्रार प्राप्त नाही.
(२) व (३) परराज्यात बाळविक्री प्रकरणी दाखल ११ गुन्ह्यांमध्ये ४७ आरोपींना अटक करण्यात आली असून ५ गुन्हयात मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहेत. तर उर्वरित ६ गुन्ह्यांचा तपास सुरु आहे.

सदरच्या ११ दाखल गुन्ह्यांपैकी अप क्र. १०१/२०२२ या एका गुन्हयात एका आरोपीने वैद्यकीय क्षेत्राची पदवी नसतानाही स्वत:च्या नावापुढे डॉक्टर ही पदवी लावून रुग्णांचे इलाज केल्याचे आढळून आल्याने या बनावट डॉक्टर विरुध्द रुग्णांचे जीव धोक्यात आणल्याने कलम ४१९ भादंवि सह ३३(१) महाराष्ट्र मेडीकल प्रेक्टीशनर्स एक्ट, १९६१ नुसार कलम वाढ करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे राजापुर (ता.येवला, जि.नाशिक) येथील युवकांवरील गुन्हे मागे घेण्याबाबत

**(२७) * १६८५४ श्री.नरेंद्र दराडे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे राजापुर (ता.येवला, जि.नाशिक) येथील युवकांनी विना परवाना गावातील चौकात श्री.छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा दिनांक २० नोव्हेंबर, २०२० रोजी बसविल्यामुळे त्यांच्यावर येवला पोलीस स्टेशन येथे गुन्हा नं ३३३/२०२० अंतर्गत भादंवी क, १४३, १४९, ४४७ सह महाराष्ट्र पुतळयांच्या विनय भंगास अधिनियम १९९७ चे कलम ११ प्रमाणे सह मुंबई पोलीस कायदा कलम ३७(१)(३) चे उल्लंघन १३५ प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांनी त्यांच्या कार्यकाळात सदरील गुन्हे मागे घेण्याबाबत सूचित केले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विद्यमान मुख्यमंत्री महोदयांनीही येवला येथे दिनांक ३० जुलै, २०२२ रोजी दौऱ्यावर असताना गुन्हे मागे घेण्यात येतील अशी घोषणा केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त युवकांवरील सर्व गुन्हे मागे घेण्याबाबत सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) याबाबतचे निवेदन प्राप्त नाही.
(३) होय, हे खरे आहे.
(४) राजकीय व सामाजिक आंदोलनातील खटले मागे घेण्याबाबतच्या गृह विभाग, शासन निर्णय क्र. पीआरओ ०९२१/प्र.क्र.२८२/विशा-२, दिनांक २०/०९/२०२२ नुसार उप विभागीय अधिकारी, येवला यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीमार्फत याप्रकरणी कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील कारागृहांमध्ये क्षमतेपेक्षा अधिक कैदी असल्याबाबत

**(२८) * १५१५१ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मध्यवर्ती, महिला, जिल्हा आणि खुल्या अशा ६४ कारागृहांत एकूण २४ हजार ७७२ कैदी सामावण्याची क्षमता असतानादेखील सद्य:स्थितीत या कारागृहांत तब्बल ३६ हजार ८५२ कैदी बंदिवासात असल्याचे वास्तव दिनांक २८ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील मध्यवर्ती कारागृहांची अवस्था दयनीय असून या कारागृहांत क्षमतेच्या दुप्पट कैद्यांना ठेवण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यात नवीन कारागृहे उभारण्यासह कारागृहांची क्षमता वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) राज्यात मध्यवर्ती, महिला, जिल्हा आणि खुली कारागृहे अशी एकूण ६० कारागृहे असून त्यांची अधिकृत बंदीक्षमता एकूण २४,७२२ इतकी आहे. ३१ ऑक्टोबर, २०२२ अखेर सदर कारागृहांमध्ये ४१,२५५ इतके बंदी प्रत्यक्षात बंदीस्त आहेत.
(२) राज्यात एकूण ०९ मध्यवर्ती कारागृहे आहेत. या कारागृहांची अधिकृत बंदीक्षमता १४,९९४ इतकी असून, ३१ ऑक्टोबर, २०२२ अखेर या कारागृहांमध्ये २८,४०९ इतके बंदी बंदीस्त आहेत, ही वस्तुस्थिती आहे.
(३) राज्यात नवीन कारागृहे उभारण्यासह कारागृहांची क्षमता वाढविण्यासाठी ठाणे व येरवडा (पुणे) या दोन्ही कारागृहांतील अस्तित्वातील जागेवर जवळपास ३००० बंदी क्षमतेचे नवीन कारागृह बांधण्यासाठीचे प्रस्ताव महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या., वरळी, मुंबई यांना पाठविण्यात आलेले आहेत.

तसेच, अहमदनगर जिल्हा (नारायणडोह) येथे ५०० बंदीक्षमतेचे तर नवनिर्मित पालघर जिल्ह्यात १५०० बंदीक्षमतेचे नवीन कारागृह बांधण्याचे प्रस्तावित असून, सन २०२२-२३ या वित्तीय वर्षात सदर नवीन कारागृहांसाठी निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. त्याचबरोबर, गोंदिया, हिंगोली, मुंबई, भुसावळ, अलिबाग, नांदेड या ठिकाणी प्राप्त झालेल्या जागेवर नवीन कारागृह बांधकाम प्रस्तावित आहे.

कारागृहांची क्षमता वाढविण्याच्या अनुषंगाने बारामती उपकारागृह येथे २०० बंदीक्षमतेचे इमारतीचे बांधकाम प्रस्तावित असून, त्यासाठी रुपये १४.९६ लक्ष इतक्या निधीस प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. येरवडा मध्यवर्ती कारागृह येथे नवीन ८ बॅरेक्सपैकी ०६ बॅरेक्सचे काम पूर्ण झालेले असून, ०२ बॅरेक्सचे काम अंतिम टप्प्यात आहे. सदर काम पूर्ण झाल्यावर या कारागृहाची बंदीक्षमता २०० ने वाढणार आहे. तर येरवडा महिला कारागृहामध्ये १०० बंदीक्षमतेचे G+१ चे काम पूर्ण झालेले असून, सदर कारागृहाची बंदीक्षमता १०० ने वाढलेली आहे. त्याचबरोबर, येरवडा व विसापूर खुले कारागृह, चंद्रपूर, यवतमाळ, बुलढाणा, सातारा, अहमदनगर, सोलापूर या जिल्हा कारागृहांत आणि मुंबई, ठाणे, नागपूर या मध्यवर्ती कारागृहांत नवीन बॅरेक्सची बांधकामे प्रगतीपथावर आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तिसगांव-वाळुंज महानगर (ता.गंगापूर, जि.औरंगाबाद) येथे मंजूर असलेले सब स्टेशन सुरु करणेबाबत

**(२९) * १५३४० श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तिसगांव-वाळुंज महानगर (ता.गंगापूर,जि.औरंगाबाद) येथे सिडको सब स्टेशन अंतर्गत जवळपास २५ हजार वीज ग्राहक आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ठिकाणी नागरी वसाहती वाढल्यामुळे कार्यरत सब स्टेशनवर अधिकचा भार पडत असल्याने विद्युत मंडळाने मागील वर्षी तिसगांव येथे सब स्टेशन मंजूर केले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर परिसरात अतिरिक्त भारामुळे नागरी वस्त्यामध्ये सुरळीत वीज पुरवठा होत नाही, तज्ज्ञ कर्मचारी नाही, ट्रान्सफॉर्मर जाळी/कंपाऊड नाही, मोठ्या प्रमाणात विद्युत तारा लोंबकळत असतात, आवश्यक ठिकाणी विद्युत खांब उभे करण्याचे काम बऱ्याच दिवसापासून प्रलंबित असल्याने याबाबत मोठ्या प्रमाणावर स्थानिकांच्या तक्रारी आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने तिसगांव येथे मंजूर केलेले सब स्टेशन सुरु करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

तिसगांव वाळुंज महानगर सबस्टेशन अंतर्गत सद्य:स्थितीत विविध वर्गवारीतील एकूण १९६१६ एवढे वीज ग्राहक आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) हे अंशत: खरे आहे. परंतु अतिभारामुळे व इतर कारणामुळे विद्युत पुरवठा खंडीत झालेला असल्यास, तो पूर्ववत करण्यात येतो. तिसगाव परिसर व वाळुंज महानगर येथील रोहीत्रे जाळी अभावी धोकादायक स्थितीत नसून, विद्युत वाहिन्यांची देखभाल व दुरुस्ती नियमितपणे करण्यात येते.
(४) केंद्र शासनाच्या सुधारित वितरण क्षेत्र योजनेंतर्गत नुतनीकरणाच्या घटकांतर्गत ३३/११ के.व्ही. नवीन तिसगांव उपकेंद्र निर्मिती व अतिभारीत सिडको उपकेंद्राची स्थापित क्षमतावाढ प्रस्तावित असून, मंजुरीनंतर सदर कामे पूर्ण करण्याचे नियोजित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी वैधानिक विकास मंडळांचे पुनर्गठन करण्याबाबत

**(३०) * १६२४६ श्री.अंबादास दानवे, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १३३७८ ला दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने विदर्भ तसेच मराठवाडा, उर्वरित महाराष्ट्राचा अनुशेष दूर करण्यासाठी स्थापन केलेल्या विकास मंडळांना तब्बल २९ महिन्यांनी मुदतवाढ देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तब्बल ११ वर्षानंतर "वैधानिक" हा शब्दही बहाल करण्यात आला असून विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी वैधानिक विकास मंडळे पुन्हा स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गत काही वर्षांपासून शासनाकडून मिळणाऱ्या अपुऱ्या निधीमुळे विदर्भ व मराठवाड्याचा अनुशेष दूर होत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विदर्भ व मराठवाड्यातील मागास भागाचा अनुशेष भरुन काढण्यासाठी पुरेसा निधी देण्याच्यादृष्टीने व मंडळाच्या पुनर्गठनाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही. विदर्भ विकास मंडळ, मराठवाडा विकास मंडळ व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळांना मुदतवाढ देण्यात आली नसून मा.मंत्रिमंडळाने दिनांक २७/०९/२०२२ च्या बैठकीत सदर वैधानिक विकास मंडळाचे पुनर्गठन करण्याच्या प्रस्तावास मान्यता दिली आहे.
(२) मा.मंत्रिमंडळाच्या दिनांक २७/०९/२०२२ च्या बैठकीत विदर्भ विकास मंडळ, नागपूर, मराठवाडा विकास मंडळ, औरंगाबाद व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळ, मुंबई पुनर्गठीत करण्यास व या विकास मंडळांना "वैधानिक विकास मंडळ संबोधण्याचा" निर्णय घेण्यात आला आहे.
(३) व (४) "निर्देशांक व अनुशेष समिती" ने दिनांक ३१/०३/१९९४ रोजीचा दर्शविलेला व मा.राज्यपालांनी मान्य केलेला रुपये १४००६.७७ कोटी वित्तीय अनुशेषाचे निर्मुलन करण्यात आले आहे. त्यामध्ये विदर्भ व मराठवाड्याचा रुपये १०६२८.५७ कोटीचा वित्तीय अनुशेषाचा समावेश आहे.

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३७१(२) अन्वये विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळांच्या क्षेत्रास विकास खर्चाकरीता निधीचे समन्यायी वाटप करण्याची विशेष जबाबदारी मा.राज्यपालांवर सोपविण्यात आली आहे. त्यानुसार, मा.राज्यपालांच्या सन २००२ च्या निदेशानुसार अद्यापपर्यंत विभाज्य निधी वाटप विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळ क्षेत्रात अनुक्रमे २३.०३%, १८.७५% व ५८.२३% या प्रमाणात करण्यात येते.

वरील (१) नुसार "विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळे पुनर्गठित करणे आणि त्यांना वैधानिक विकास मंडळे संबोधण्यात यावे" या मा.मंत्रिमंडळ निर्णयानुसार मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्यास्तरावरुन दिनांक २८/१०/२०२२ च्या अर्ध शासकीय पत्रान्वये तीनही विकास मंडळे पुनर्गठित करण्याबाबत त्वरीत कार्यवाही करण्याची मा.गृहमंत्री, भारत सरकार यांना विनंती करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पलुस (ता.कडेगाव, जि.सांगली) पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक यांचेवर विनयभंगाचा व ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्याबाबत

**(३१) * १५१३८ श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पलुस (ता.कडेगाव, जि.सांगली) पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक (API) यांचेवर विनयभंगाचा व ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्याची मागणी पलुस पोलीस ठाण्यातील महिला पोलीस कर्मचाऱ्यांनी राज्याचे माननीय मुख्यमंत्री, मा.गृह मंत्री, मा.अध्यक्ष महिला आयोग यांना दिनांक २६ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पलुस पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हे पलुस पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी म्हणून काम पाहत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर पोलीस अधिकारी यांच्यावर झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) होय.
(३) यासंदर्भातील निनावी तक्रारीवर अर्जदार म्हणून एक महिला पोलीस कर्मचारी असा उल्लेख असल्याने सदर तक्रारीच्या अनुषंगाने उपविभागीय पोलीस अधिकारी तासगाव विभाग, तासगाव यांच्या मार्फत पलुस पोलीस ठाणे येथील महिला कर्मचाऱ्यांकडे चौकशी करण्यात आली. महिला पोलीस कर्मचाऱ्यांनी असा प्रकार घडला नसल्याचे चौकशीवेळी सांगितले. त्यामुळे पोलीस अधिकारी यांचेवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मोरा सागरी (ता.उरण, जि.रायगड) पोलीस ठाण्याच्या नवीन इमारतीचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(३२) * १५३९८ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ज्या सागरी पोलीस ठाण्याची सन १९९३ च्या मुंबई बॉम्ब स्फोटानंतर निर्मिती करण्यात आली त्यातील मोरा सागरी (ता.उरण, जि.रायगड) पोलीस ठाण्याच्या नवीन इमारतीचे बांधकाम निधी अभावी गत चार वर्षांपासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर इमारतीच्या बांधकामासाठी झालेल्या विलंबामुळे बांधकामाचा खर्च ८६ लाखावरून आता सुमारे १ कोटी ८२ लाखापेक्षा जास्त होणार आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, निधी अभावी इमारतीचे काम प्रलंबित असल्याने पोलिसांना अनेक समस्यांना सामोरे जाण्याची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मोरा सागरी पोलीस ठाणे इमारतीचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) होय. हे अंशत: खरे आहे.

मोरा सागरी पोलीस ठाणेचे नवीन प्रशासकीय इमारत बांधकामासाठी दिनांक २१/०२/२००८ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात येवून प्रथम रुपये २४ लाख व दिनांक १२/०१/२००९ अन्वये रुपये ३३.१८ लाख, दिनांक १२/०१/२०११ अन्वये ८६,४७,९५२/- असे रुपये १,४३,६५,९५२/- इतका निधी सार्वजनिक बांधकाम विभागास उपलब्ध करण्यात आला होता. सुरुवातीला पोलीस ठाण्याच्या बांधकामासाठी २४८.१३ चौ.मीटर क्षेत्रफळासाठी तांत्रिक मान्यता प्राप्त झाली होती. तथापि, प्रत्यक्ष बांधकाम करताना स्तंभाच्या पायासाठी कठीण खडक अंदाजपत्रकापेक्षा जास्त खोल गेल्यामुळे पायाच्या बांधकामामध्ये बरीच वाढ होऊन एकूण ४२५,९० चौ.मीटरचे बांधकाम करावे लागले. तसेच सांडपाणी निचरा होणेकामी सेप्टींक टँक, पाणी साठविण्यासाठी जमिनी खालील पाण्याची टाकी, छतावर पाण्याची टाकी, छतगळती प्रतिबंधक उपाययोजना, छतावर पत्रा शेड, कुंपण-भिंती व पेव्हरब्लॉक इत्यादी

अंदाजपत्रकामध्ये समावेश नसलेली कामे करण्यासाठी एकूण ९५.०४ लाखाचे वाढीव अंदाजपत्रक अधीक्षक अभियंता, रायगड सार्वजनिक बांधकाम मंडळ यांनी तयार केलेला प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सदर वाढीव बांधकामाचा खर्च वाढल्याने निधी अभावी इमारत बांधकाम पूर्ण झालेले नाही. तसेच सदर उर्वरीत वाढीव बांधकाम करणेसाठी लागणारा निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नंदुरबार जिल्ह्यातील सरदार सरोवर प्रकल्पांतर्गत नर्मदा विकास विभागाव्दारे स्वच्छ सिंचन सुविधा या योजनेत कंत्राटदार व संबंधित अधिकारी यांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत

**(३३) * १६१९५ श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नंदुरबार जिल्ह्यातील सरदार सरोवर प्रकल्पांतर्गत नर्मदा विकास विभागाव्दारे स्वच्छ सिंचन सुविधा या योजनेतून शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणारे अनुदान कंत्राटदारांनी घेऊन गैरव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नर्मदा विकास विभाग, उपविभाग क्र.०३ येथील अधिकारी सदर गैरव्यवहारात सहभागी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर गैरव्यवहारात सहभागी असलेल्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही. सरदार सरोवर प्रकल्पांतर्गत प्रकल्पबाधित लाभार्थ्यांना स्वेच्छा सिंचन सुविधांचे अथवा सामाईक स्वेच्छा सिंचन सुविधा अनुदानाची रक्कम ही प्रकल्प बाधितांच्या खात्यावर थेट धनादेशाद्वारे जमा करण्यात येते. सदर अनुदानातून प्रकल्पबाधिताने स्वतः कुपनलिकेचे काम पूर्ण करून घ्यावयाचे आहे. त्यासाठी खात्यामार्फत निविदा प्रक्रिया राबविली जात नाही. सबब, गैरव्यवहार करणेचा प्रश्न उद्भवत नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धारावी (मुंबई) येथील प्रलंबित पुनर्विकास प्रकल्प सुरू करण्याबाबत

**(३४) * १५२५५ श्री.महादेव जानकर, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.सचिन अहिर, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने धारावी (मुंबई) पुनर्विकास प्रकल्प (डीआरपी) गत १८ वर्षांपासून प्रलंबित असून पुनर्विकास प्रकल्पाकरीता निविदा मागविण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकल्प गेली १८ वर्षे प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, धारावी पुनर्विकास प्रकल्पात रेल्वेच्या जागेच्या हस्तांतरणाबाबत झालेल्या सामंजस्य करारातील अटी व शर्तीनुसार दिनांक २८ मे, २०१९ च्या शासन निर्णयानुसार रुपये ८००/- कोटी रक्कमेचा आगाऊ भरणा (Upfront Amount) रेल्वेस अदा करण्यात आला असून सांमजस्य करारानुसार रेल्वेने मोकळी तसेच कार्यात्मक (Operational) जमीन धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या ताब्यात अद्याप दिली नसल्याने याबाबत रेल्वेशी वारंवार पत्रव्यवहार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकल्पाचे शासनाने राबविलेल्या निविदा प्रक्रियेस किती कंपन्यानी प्रतिसाद दिला आहे,
(५) असल्यास, उक्त प्रकल्प त्वरित सुरु करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच संघटनांनी शासनाकडे गत ५ वर्षापासून निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, धारावी पुनर्विकास प्रकल्पाची सुरुवात तातडीने करून हा प्रकल्प मार्गी लावण्याकरीता शासन कोणत्या उपाययोजना करणार वा करीत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

धारावीतील सर्व सेक्टर्सचा (सेक्टर क्र. १ ते ५) पुनर्विकास गृहनिर्माण विभाग, शासन निर्णय दिनांक ०५/११/२०१८ व दिनांक २८/०९/२०२२ नुसार विशेष हेतू कंपनीमार्फत (Special Purpose Vehicle) एकत्रितरित्या करण्याचे प्रस्तावित आहे. त्याकरीता धारावी पुनर्विकास प्रकल्प, मुंबई यांनी दिनांक ३०/०९/२०२२ रोजी 'प्रकल्प सल्लागार'च्या नेमणुकीकरीता व दिनांक ०१/१०/२०२२ रोजी विशेष हेतू कंपनीअंतर्गत मुख्य भागीदाराच्या नेमणूकीकरीता जागतिक निविदा मागविल्या होत्या. सदर निविदा उघडण्यात आल्या असून पुढील कार्यवाही सुरू आहे.
(२) प्रकल्प मार्गी लावण्याकरीता बरेच प्रयत्न करण्यात आले. तथापि, विकासक नियुक्त न झाल्याने प्रकल्प रखडला.
(३) धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी रेल्वेच्या जागेच्या हस्तांतरणाबाबत झालेल्या सामंजस्य करारातील अटी व शर्तीनुसार दिनांक २८/०५/२०१९ च्या शासन निर्णयानुसार रुपये ८०० कोटी रकमेचा आगाऊ भरणा (Upfront Amount) रेल्वेस अदा करण्यात आला आहे. त्यानंतर रेल्वे जमीन ताब्यात देण्यात यावी याकरीता धापुप्रा, मुंबई मार्फत रेल्वेच्या संबंधित विभागास पत्रे पाठविली होती व पाठपुरावा केला होता.

दिनांक १८/१०/२०२२ रोजी रेल भूमि विकास प्राधिकरणाशी ९९ वर्षाकरीता (Lease Deed Agreement) करार करण्यात आला असून दिनांक ०४/११/२०२२ रोजी सदर करार (Lease Deed Agreement) नोंदणीकृत करण्यात आला आहे. दिनांक २९/११/२०२२ रोजी अधीक्षक भूमि अभिलेख, मुंबई शहर यांना मोजणी फी रक्कम रुपये २८,५३,०००/- भरण्यात आली असून मोजणी करुन रेल भूमि विकास प्राधिकरणाची जमीन ताब्यात घेण्याची प्रक्रिया चालू आहे.
(४), (५) व (६) प्रकल्प सल्लागार तसेच मुख्य भागीदाराच्या नेमणूकीकरीता मागविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेस प्रत्येकी ३ निविदादारांनी प्रतिसाद दिला आहे.

धारावी पुनर्विकास प्रकल्पाकरीता प्राप्त झालेल्या पात्र विकासकांच्या आर्थिक निविदा (तांत्रिक मूल्यांकनानंतर) उघडण्यात आल्या असून सचिव समिती स्तरावर सदर बाब विचारार्थ ठेवण्यात आली आहे.

-----------------

## मुंबईतील महिलांवरील गुन्ह्यांच्या घटनांमध्ये वाढ झाल्याबाबत

**(३५) * १६०७९ अॅड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत गेल्या नऊ वर्षात अपहरणाच्या गुन्ह्यात ६५० टक्के, महिलांवरील बलात्काराच्या घटनेत २३५ टक्के आणि विनयभंगाच्या गुन्ह्यात १७२ टक्क्यांनी वाढ झाल्याचे प्रजा फाऊंडेशनने गुन्हेगारी घटनांचा आढावा घेऊन तयार केलेल्या अहवालातून निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२१ मध्ये नोंदवण्यात आलेल्या गंभीर गुन्ह्यांची संख्या २५ हजार ८४१ असून त्यापैकी ६९९२ गुन्ह्यांमध्ये आरोपपत्र दाखल झाले आहेत तर १७ हजार ४४५ गुन्ह्यांचा तपास अद्याप सुरु असल्याचे नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बालकांवरील लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत (पोस्को), सन २०२१ अखेरपर्यंत ९३ टक्के गुन्हे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महिला आणि मुलांवरील वाढत्या अत्याचारांच्या गुन्हेगारीला आळा बसावा तसेच प्रलंबित गुन्हे निकाली काढण्यासाठी शासनाने कोणती ठोस निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) सन २०१२ मध्ये बलात्काराचे एकूण २३१ इतके गुन्हे दाखल असून सन २०२१ मध्ये ८८८ इतके गुन्हे दाखल आहेत. सन २०१२ च्या तुलनेत सन २०२१ अखेरीस २८४% इतकी वाढ झालेली आहे.

सन २०१२ मध्ये अपहरणाचे एकूण १४१ इतके गुन्हे दाखल आहेत. सन २०२१ मध्ये ११०३ इतके गुन्हे दाखल आहेत. सन २०१२ च्या तुलनेत सन २०२१ मध्ये ६६२% इतकी वाढ झालेली आहे.

सन २०१२ मध्ये विनयभंगाचे एकूण ५९० इतके गुन्हे दाखल आहेत. सन २०२१ मध्ये २०७७ इतके गुन्हे दाखल आहेत. सन २०१२ च्या तुलनेत सन २०२१ मध्ये २५२% इतकी वाढ झालेली आहे.

(२) सन २०२१ मध्ये मुंबई शहरात एकूण २२१५१ इतके गंभीर गुन्हे नोंद करण्यात आले आहेत. त्यापैकी एकूण १३९१७ गुन्ह्यांमध्ये मा.न्यायालयामध्ये दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहेत.

(३) मुंबई शहरामध्ये बालकांवरील लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत (पोस्को) अंतर्गत सन २०२१ मध्ये एकूण १०४८ एवढे गुन्हे नोंद करण्यात आले असून त्यापैकी एकूण ८१० गुन्ह्यांमध्ये मा.न्यायालयामध्ये दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहेत.

(४) पोलीस आयुक्तालय, मुंबई अंतर्गत महिला अत्याचार प्रतिबंध शाखा स्थापन केली आहे. महिला सुरक्षा पुढाकारयोजनेंतर्गत मुंबईतील निर्जन स्थळी पुरेशी प्रकाश व्यवस्था ठेवणे व सीसीटीव्ही बसविण्याची कार्यवाही सुरु आहे. मुंबई शहरात महिलांच्या सुरक्षिततेसाठी मुंबई शहर महिला सुरक्षितता पुढाकार योजना हा उपक्रम राबविण्यात येत आहे. महिलांवरील अत्याचारासंदर्भात दाखल गुन्हयांबाबत विशेष तपास पथक गठीत करण्यात आले आहे. बलात्कार पिडीत महिला व बालक तसेच इतर लैंगिक अत्याचारातील पिडीत बालक यांना अर्थ सहाय्य करणारी मनोधैर्य योजना शासनाकडून राबविण्यात येत आहे. केंद्र व राज्य शासनाच्या अधिपत्याखाली वन स्टॉप सेंटर यांची मुंबई शहर करीता के.ई.एम. रुग्णालय व मुंबई उपनगराकरीता ट्रामा केअर सेंटर, जोगेश्वरी येथे कार्यान्वित असून तेथे वैद्यकीय मदत, तात्पुरता निवारा,

कायदेशीर मदत व एकाच छताखाली समुपदेशन ही सेवा पुरविली जाते. कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणाऱ्या लैंगिक शोषणास प्रतिबंध व्हावा यासाठी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण प्रतिबंधक, मनाई व निवारण अधिनियम-२०१३ अन्वये कारवाई करण्यात येते. प्रमुख रेल्वे स्थानके/ एस.टी.स्टॅन्ड येथे पोलीस मदत केंद्रे स्थापन केली आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पत्राचाळ (गोरेगाव) व काळाचौकी (जिजामातानगर) मुंबई येथील वसतिगृहाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(३६) * १६२८६ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोरेगाव, मुंबई येथील पत्राचाळ आणि काळाचौकी येथील जिजामातानगर (म्हाडा मुंबई मंडळ) या दोन ठिकाणी शिक्षण, नोकरीच्या निमित्ताने बाहेरून मुंबईत येणाऱ्या मुला-मुलींच्या निवासाची आणि खाण्यापिण्याची व्यवस्था व्हावी या उद्देशाने वसतिगृह बांधण्याचा निर्णय शासनाने घेतला असून केवळ पत्राचाळ, गोरेगाव येथील वसतिगृहाच्या कामाला दिनांक २२ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास सुरूवात झाली मात्र जिजामाता नगर येथील वसतिगृहाच्या बांधकामाला ८ महिन्याचा कालावधी उलटून गेला तरीही आजमितीस कामाला सुरुवात झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिजामाता नगर येथील १८२१ चौ.मीटर क्षेत्रावर उभारण्यात येणाऱ्या वसतिगृहाच्या बांधकामाचे कंत्राट सी.बी. ॲन्ड सन्स कंपनी यांना देण्यात आले असून मेसर्स एस.पी.शेवडे ॲन्ड असोसिएट म्हणून काम पाहणार आहेत. उक्त बांधकामाचा कंत्राटदाराला कार्यादेश देऊनही ८ महिने झाले असूनही वसतिगृहाच्या कामास अद्याप सुरूवात न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जिजामातानगर येथील वसतिगृहाचे अद्यापी सुरू न झालेले काम विनाविलंब हाती घेऊन लवकरात लवकर पूर्ण होऊन वसतिगृह प्रत्यक्षात कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) म्हाडाच्या मुंबई मंडळाच्या अभिन्यासातील गोरेगाव येथील पत्राचाळ या वसाहतीमध्ये मुला-मुलींकरीता वसतिगृह बांधण्याचा कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही.

जिजामाता नगर, काळाचौकी, मुंबई येथील भूकर क्र.१५८ या म्हाडाच्या मुंबई मंडळाच्या मालकीच्या भूखंडावर मुला-मुलींचे वसतिगृह बांधण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.
(२), (३) व (४) जिजामाता नगर येथील मुला-मुलींच्या वसतिगृहाच्या बांधकामाकरीता वास्तुशास्त्रज्ञ म्हणून मे.एस.पी. शेवडे ॲण्ड असोसिएट्स यांची नियुक्ती म्हाडाकडून करण्यात आली आहे. सदरहू कामाकरीता म्हाडाकडून ई-निविदा मागविण्यात आल्या. सदरहू निविदानुसार मे.सी.बी. ॲण्ड सन्स कंपनी या न्यूनतम निविदाकारास दिनांक २२/११/२०२२ रोजी कार्यादेश देण्यात आले आहेत. उक्त काम पूर्ण करण्याचा कालावधी २४ महिने एवढा आहे.

-----------------

## राज्यातील वीज ग्राहकांकडून वहन आकार वसुली बंद करण्याबाबत

**(३७) * १५७४२ प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वीज देयकासह प्रत्येक ग्राहकांकडून वहन आकार वसूल केला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू वहन आकार हा नियमबाह्य असून राज्य शासकीय महावितरण कंपनी माहे नोव्हेंबर, २०१६ पासून ही वसुली करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार सदरहू वहन आकार वसुली बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

विद्युत अधिनियम, २००३ मधील तरतुदीनुसार मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास राज्यातील वीज वितरण परवानाधारकांच्या ग्राहकांचे वीजदर निश्चित करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. त्यानुसार वीज वितरण कंपन्या वीज देयकांची आकारणी करतात.

दिनांक ३ नोव्हेंबर, २०१६ चा वीजदर आदेश येण्यापूर्वी वीज बिलात स्थिर आकार व वीज आकार (अस्थिर आकार) अशा दोन भागात आकारणी होत असे. मा.आयोगाच्या दिनांक ३ नोव्हेंबर, २०१६ च्या आदेशात मा.आयोगाने प्रथमच वीज दरातील अस्थिर आकाराच्या भागाची वहन आकार आणि वीज आकार अशा दोन भागात विभागणी केली आहे. त्यामुळे वहन आकार हा कुठलाही नवीन आकार नसून पुर्वीच्याच अस्थिर आकाराचा एक भाग आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गोंदिया व गडचिरोली जिल्ह्यांमध्ये अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समितीचे कार्यालय स्थापन करण्याबाबत

**(३८) * १५६९६ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया व गडचिरोली जिल्ह्यात आदिवासी बांधवाना जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी करण्यासाठी नागपूर येथे ३०० कि.मी. अंतरावर यावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्ह्यातील जनतेसाठी गोंदिया व गडचिरोली येथे जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समितीचे कार्यालय स्थापन करण्याची मागणी अनेक वर्षांपासून स्थानिकांनी व आदिवासी संघटनेने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त जिल्ह्यात जात वैधता प्रमाणपत्र कार्यालय स्थापन करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) नागपूर महसूल विभागाचे भौगोलिक आकारमान मोठे असून त्यामधील गडचिरोली जिल्ह्याचे क्षेत्रफळ विचारात घेऊन दिनांक ०८/१२/२००६ रोजीच्या शासन निर्णयान्वये गडचिरोली येथे अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती कार्यालय सुरु करण्यात आले आहे. तसेच दिनांक १३/०९/२०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार गोंदीया येथेही अनुसूचित जमाती प्रमाणत्र तपासणी समिती कार्यालय दिनांक २९/०६/२०२२ पासून सुरु करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील आदिवासी पाड्यांवरील १५० हून अधिक शाळा बंद असल्याबाबत

**(३९) * १६३२३ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.महादेव जानकर, श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात आदिवासी विभागाकडून प्रतिवर्षी मिळणारे अनुदान न मिळाल्याने नामांकित दर्जा असणाऱ्या १५० शाळा कित्येक दिवस बंद असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू अनुदानातून विद्यार्थ्यांना कपडे शैक्षणिक साहित्य, निवासाची सोय आणि भोजनाची व्यवस्था केली जात असून अनुदान न मिळाल्यामुळे राज्यातील सुमारे ५५ हजार आदिवासी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पातंर्गत शिक्षण घेत असलेल्या हजारो आदिवासी विद्यार्थ्यांचे गेल्या तीन शैक्षणिक वर्षापासून शुल्क शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आदिवासी विकास विभागाच्या अंतर्गत अनुदान दिले जाणाऱ्या नामांकित शाळांच्या विद्यार्थ्यांचे प्रवेश माहे जून/जुलै पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असूनही काही ठिकाणी माहे नोव्हेंबर महिन्यात प्रवेश देण्याची प्रक्रिया सुरू होती, हे ही खरे आहे काय ?
(५) असल्यास, सदरहू अनुदान प्राप्त न होणे तसेच विलंबाने प्रवेश देण्याबाबतची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, संबंधितांवर काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.

सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात कोविड-१९ या विषाणूमुळे जागतिक महामारीसारखी उध्दभवलेली अभुतपूर्व परिस्थिती बघता शाळा या पूर्णत: बंद होत्या.

विद्यार्थ्यांची ऑनलाईन / ऑफलाईन उपस्थिती व शैक्षणिक संच इ. बाबी तपासण्यामधील येणाऱ्या अडचणी लक्षात घेता शैक्षणिक वर्ष २०२०-२१ या शैक्षणिक वर्षामध्ये २५ टक्के अंतरिम उपाययोजना म्हणून शाळांना शुल्क वितरीत करण्यात आले आहे.

सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षामध्ये ३० टक्के शुल्क शाळांना वितरीत करण्यात आले आहे.

सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षामध्ये पहिल्या हप्त्यापोटी ५० टक्के शाळांना शुल्क अदा करण्याच्या अनुषंगाने शाळांना प्रथमत: ३० टक्के शुल्क अदा करण्यात आले असून उर्वरीत २० टक्के शुल्क अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) हे अंशत: खरे आहे.

दिनांक २९/०९/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षामध्ये विद्यार्थ्यांना इयत्ता १ ली मध्ये प्रवेश देण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औद्योगिक ग्राहकांकरिता केलेली वीज दरवाढ मागे घेण्याबाबतच्या मागण्या मान्य करण्याबाबत

**(४०) * १६६५५ श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील उद्योजकांनी औद्योगिक ग्राहकांना केलेली वीज दरवाढ मागे घेण्यासाठी एमआयडीसी महावितरण कार्यालयासमोर वीजेची बिले जाळली असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इंधन समायोजन आकाराच्या नावाखाली औद्योगिक वीज पुरवठा दरात केलेली २० टक्के दरवाढ तातडीने मागे घ्यावी तसेच औद्योगिक क्षेत्रातील वीज बिल वसुली ९० टक्केपेक्षा जास्त असल्याने दुप्पट सुरक्षा ठेव जमा करण्याचे आदेश ही मागे घ्यावा, अशी मागणी करत मा.मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, ऊर्जामंत्री महोदयांना ई-मेल द्वारे निवेदन पाठविले आहे हे ही खरे काय,

(३) असल्यास, इंधन समायोजन आकारामध्ये वीज वितरण गळती १४ टक्के ऐवजी मार्च मध्ये ३५ टक्के, एप्रिल मध्ये ३० टक्के व मे मध्ये २६ टक्के या प्रमाणात सरासरी दाखवून ३० टक्के गळती मान्यता देण्यात आल्याने ग्राहकांवर अतिरिक्त १६ टक्के गळतीमुळे होणाऱ्या संपूर्ण नुकसानीचा भार महावितरण कंपनीवर टाकण्यात यावा व त्यासाठी कायदेशीर तरतूद करण्याची मागणी केली आहे हे ही खरे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त निवेदनावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

अहमदनगर एमआयडीसी कक्ष महावितरण कार्यालयासमोर विजेची बिले दिनांक १०/०८/२०२२ रोजी जाळली असल्याची बाब निदर्शनास आली आहे.

(२) हे खरे आहे.

मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहुवर्षीय वीज दर) विनियम, २०१९ च्या विनियम क्रमांक १० नुसार इंधन समायोजन आकार मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाद्वारे निश्चित केला जातो. विजेच्या मागणीत झालेली वाढ, वीज खरेदी दरामध्ये झालेली वाढ, इंधनाचे वाढलेले दर, कोळशाचा तुटवडा,

कायद्यातील बदल इ. नियंत्रित न करता येणाऱ्या घटकांमुळे महावितरणचा प्रत्यक्षात झालेला वीज खरेदी खर्च आणि आयोगाने मंजूर केलेला वीज खरेदी खर्च ह्यामध्ये तफावत असल्यास सदर खर्च मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या पूर्व मंजूरीने इंधन समायोजन आकाराच्या माध्यमातून ग्राहकांकडून वसूल करण्यात येतो.

मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग विद्युत पुरवठा संहिता विनियम, २०२१ मधील विनियम १३ नुसार मागील वर्षाच्या सरासरी एक महिन्यांच्या देयक रकमेच्या दुप्पट रक्कम अनामत रक्कम म्हणून ग्राहकांकडून वीज देयकामधून वसूल करण्याची तरतूद आहे. त्यानुसार ग्राहकाकडून आवश्यक रकमेची सुरक्षा ठेव वसूल करण्यात येते.

(३) हे खरे आहे.

(४) मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने सन २०२१-२२ व २०२२-२३ साठी अनुक्रमे वार्षिक सरासरी १६% आणि १४% वीज वितरण हानी मंजूर केलेली आहे. मंजूर केलेल्या वार्षिक वितरण हानी पेक्षा प्रत्यक्षात झालेल्या अतिरिक्त वार्षिक वितरण हानीमुळे मार्च-२०२२, एप्रिल-२०२२ आणि मे-२०२२ ह्या महिन्यात मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने अनुक्रमे रुपये ९३.९२ कोटी, रुपये ५८.४४ कोटी आणि रुपये ६६.०१ कोटी इतका इंधन समायोजन आकार नामंजूर केला आहे. त्यामुळे अतिरिक्त वीज हानीमुळे ग्राहकांवर कोणताही अतिरिक्त भार टाकण्यात आलेला नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील धोकादायक इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत

**(४१) * १६६९१ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर : दिनांक ४ मार्च, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ३ मधील प्रश्न क्रमांक ४१७६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातर्फे मुंबई शहर बेटावरील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकर प्राप्त इमारतींचे सन २०२२ मध्ये सर्वेक्षण करण्यात आले आहे, त्यामध्ये एकूण १८ उपकरप्राप्त इमारती अतिधोकादायक आढळल्या होत्या हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सर्वेक्षणात अतिधोकादायक इमारतींमध्ये ६७४ निवासी गाळे व २६६ अनिवासी गाळे असे एकूण ९४० गाळे (भाडेकरु/रहिवासी) असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे शासनाने निर्णय घेवून या इमारतींचा तातडीने पुनर्विकास किंवा दुरुस्ती करण्याबाबत तसेच रहिवाशांना इतर संक्रमण शिबीरात गाळे उपलब्ध करुन देण्याबाबत सुरु असलेल्या कार्यवाहीचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने सन २०२२ मध्ये पावसाळयापूर्वी जुन्या उपकर प्राप्त इमारतींच्या केलेल्या सर्वेक्षणामध्ये एकूण २१ इमारती अतिधोकादायक म्हणून घोषित केल्या आहेत. या इमारतींमध्ये ६७४ निवासी गाळे व २६६ अनिवासी गाळे असे एकूण ९४० गाळे (भाडेकरु/रहिवाशी) असल्याचे निर्देशनास आले आहे.

सदरहू २१ इमारतींपैकी ८ इमारतींची दुरुस्ती प्रगतीपथावर आहे. उर्वरित १३ इमारतींची दुरुस्ती करता येणार नसल्याने सदर इमारती रिक्त करणे, रहिवाशांना संक्रमण शिबीरात हलविणे, रिक्त इमारतींचे पाडकाम करण्याची कार्यवाही सुरु आहे. तथापि, रहिवाशांचा विरोध, न्याय प्रविष्ट प्रकरणे इत्यांदीमुळे काही प्रकरणांमध्ये विलंब होत आहे. अद्यापपर्यंत सदर इमारतींतील ७९ रहिवाशांना संक्रमण शिबीराचे वितरण मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शहर वाहतूक प्राधिकरणांची आगारे विकसित करून त्यांच्या अतिरिक्त जागेवर पोलिसांसाठी सेवा निवासस्थाने उभारण्याबाबत

**(४२) * १५१५० श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मेट्रो स्टेशन, एसटी आगारांसह बेस्ट, एनएनएमटी, टीएमटी, पीएमटी सारख्या शहर वाहतूक प्राधिकरणांची आगारे विकसित करून त्यांच्या अतिरिक्त जागेवर पोलिसांसाठी सेवा निवासस्थाने बांधण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी अभ्यास करण्यासाठी गृह विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे, हे हि खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(४) असल्यास, अहवालात काय अंतर्भूत करण्यात आले आहे आणि त्यातील कोणत्या शिफारसी स्वीकारण्यात आल्या आहेत,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील शहर प्राधिकरणांची आगारे विकसित करून त्याच्या अतिरिक्त जागेवर पोलिसांसाठी सेवा निवासस्थाने उभारण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३), (४) व (५) पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना पोलीस सेवा निवासस्थाने बांधण्याकरीता "पोलीस गृहनिर्माण या विषयासंदर्भात मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील दिनांक २७/०७/२०२२ रोजीच्या बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १३/०९/२०२२ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार मेट्रो स्टेशन, एस.टी. डेपो व शहर वाहतूक विभागाचे डेपो विकसीत करुन त्यावरील अतिरिक्त जागा पोलीस सेवा निवासस्थानासाठी वापरात घेण्यासाठी अभ्यास करण्यासाठी अपर मुख्य सचिव (परिवहन), गृह विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २०/०९/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठित करण्यात आली आहे.

अपर मुख्य सचिव (परिवहन) यांच्याकडून राज्य परिवहन महामंडळांतर्गत जिल्हा मुख्यालय तसेच शहरांच्या ठिकाणी उपलब्ध रिक्त जागेची प्राप्त यादी पोलीस महासंचालक व पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांना दिनांक ०७/११/२०२२ रोजी पाठविण्यात आली असून त्यांना व्यवहार्यता तपासून व आवश्यक सेवा निवासस्थानांच्या संख्येचा प्रस्ताव गृह विभागास पाठविण्याबाबत कळविले आहे.

राज्यातील एस.टी. डेपोच्या विभागवार रिक्त असलेल्या जागेवर पोलिसांसाठी सेवा निवासस्थानाचे बांधकाम करणेबाबत प्राप्त झालेल्या यादीच्या अनुषंगाने राज्यातील संबंधित पोलीस घटकांकडून माहिती संकलित करण्याची कार्यवाही चालू आहे.

-----------------

## राज्यातील विशेषत: अकोला व बुलढाणा जिल्ह्यांमध्ये सौर ऊर्जा कृषि पंप बसविणाऱ्या कंपन्यांसंदर्भातील तक्रारींच्या अनुषंगाने कारवाई करण्याबाबत

**(४३) * १६५२७ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: अकोला व बुलढाणा जिल्ह्यामध्ये मुख्यमंत्री सौर कृषि पंप योजनेमार्फत लावण्यात आलेल्या कृषि पंपाबाबत शेतकऱ्यांकडून तक्रार करुनही कोणतीही कार्यवाही होत नसल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मेहकर तालुक्यात ओसवाल कंपनी कडून बसविण्यात आलेल्या मोटरपंप व स्टार्टर हे अकुशल कामगारांकडून बसविण्यात येत असल्याने पंपाची जोडणी व्यवस्थित न झाल्याची तक्रार करुनही एक वर्ष दखल न घेतल्यामुळे पैसे भरुनही सौर ऊर्जा कृषि पंपाचा वापर शेतकऱ्यांना शेतीसाठी करता आला नाही आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कंपनीच्या टोल फ्री क्रमांकावर संपर्क केल्यास कंपनीच्या कर्मचाऱ्यांकडून उत्तरे मिळत नसल्याने जिल्हाधिकारी व महावितरण कंपनीकडे अनेकदा तक्रार करुनही शासनाकडून कोणतीही कारवाई करण्यात येत नाही आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात सौर ऊर्जा कृषि पंप बसविणाऱ्या कंपन्यांनी पुरवठा केलेल्या पंपाबाबत तक्रारी प्राप्त होऊनही याबाबत चौकशी करुन तक्रारीचे निवारण न करणाऱ्या कंपनी तसेच शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द कारवाई करुन शेतकऱ्यांना सौर कृषि पंपाबाबत योग्य सुविधा मिळण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अकोला व बुलढाणा जिल्ह्यामध्ये "मुख्यमंत्री सौर कृषि पंप योजने" अंतर्गत ५७२९ सौर कृषि पंप आस्थापित करण्यात आलेले आहेत. माहे मे, २०१९ पासून दिनांक ०९/१२/२०२२ अखेर अकोला जिल्ह्यात एकूण २५४ तक्रारी प्राप्त झाल्या, त्यातील २३९ तक्रारींचे निराकरण करण्यात आलेले असून १५ तक्रारींच्या निराकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच बुलढाणा जिल्ह्यात एकूण ५४५ तक्रारी प्राप्त झाल्या, त्यापैकी ५१७ तक्रारींचे निराकरण करण्यात आलेले असून २८ तक्रारींच्या निराकरणाचे काम प्रगतीपथावर आहे.

(२) मेहकर तालुक्यात "मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजने" अंतर्गत सौर कृषि पंप आस्थापित करण्यासाठी मे.ओसवाल कंपनीचा सूचीबध्द पुरवठादार यादीत समावेश नाही. मे.ओसवाल कंपनीकडून कोणताही सौर कृषि पंप बसविण्याचे काम करण्यात आले नाही. मेहकर तालुक्यात सूचीबध्द पुरवठादार मे.टाटा पॉवर सोलर सिस्टीम व्दारे सौर कृषि पंप आस्थापित करण्यात आले असून त्यांनी मे.ओसवाल कंपनीचा मोटारपंप वापरलेला आहे. मेहकर तालुक्यात ६ तक्रारी प्राप्त असून त्यांचे निराकरण करण्यात आलेले आहे.
(३) व (४) "मुख्यमंत्री सौर कृषि पंप योजने" अंतर्गत लाभार्थ्यांना आस्थापित केलेल्या सौर कृषि पंपाबाबतच्या तक्रारी निवारणासाठी महावितरण कंपनीच्या ग्राहक सेवा केंद्राच्या टोल फ्री क्रमांकावर नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध आहे. लाभार्थ्यांनी केलेल्या तक्रारीबाबतची नोंदणी, निराकरण इ. बाबतची माहिती लाभार्थ्यांना भ्रमणध्वनीवर एस.एम.एस. व्दारे देण्यात येते. प्राप्त तक्रार ही महावितरण कंपनीच्या मध्यवर्ती ग्राहक सेवा केंद्राव्दारे संबंधित पुरवठादारांकडे हस्तांतरीत केली जाते. याशिवाय लाभार्थ्यांनी महावितरण कंपनीच्या मंडळ कार्यालयाकडे लेखी अथवा मौखिक तक्रार केल्यास ती मंडळ कार्यालयाकडून पुरवठादारांकडे हस्तांतरीत करण्यात येते. तद्नंतर पुरवठादाराकडून तक्रारीचे निवारण करण्यात येते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जे.एन.पी.ए. कडून उभारण्यात येणाऱ्या उड्डाणपूलाच्या कामामुळे होत असलेल्या नुकसानीबाबत

**(४४) * १५४१२ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जे.एन.पी.ए. (ता.उरण,जि.रायगड) येथील चौथ्या बंदराच्या कंटेनर मालाची वाहतूक करण्यासाठी उभारण्यात येत असलेल्या उड्डाणपुलाच्या कामामुळे जसखार गावातील श्री रत्नेश्वरी मंदिराला तसेच तेथील घरांनाही तडे गेले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जे.एन.पी.ए. अंतर्गत सिंगापूर पोर्ट हे खाजगीकरणातून सर्वात मोठ्या लांबीचे चौथे बंदर उभारण्यात येत असून सुमारे ८००० कोटी खर्चाच्या या चौथ्या बंदराच्या पहिल्या टप्प्यातील काम पूर्ण झाले असून दुसऱ्या टप्प्यातील कामाला सुरुवात झाल्याने फायलिंग ब्लास्टिंग जेसीबीचे खोदकाम आदी कामांमुळे परिसरातील नागरिकांचे तसेच श्री रत्नेश्वरी मंदिराचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून तेथील नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रस्त्यांच्या भरावामुळे मागील चार वर्षांपासून जसखार परिसरातील नागरिकांच्या घरात पाणी घुसून मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे मात्र जे.एन.पी.ए. प्रशासन त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने जे.एन.पी.ए. च्या ब्लास्टिंगमुळे जसखार येथील नागरिकांच्या घरांना व रत्नेश्वरी मंदिराला तडे गेल्याने झालेल्या नुकसानीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

सिंगापूर पोर्टच्या पहिल्या टप्प्यातील काम पूर्ण झाले असून दुसऱ्या टप्प्यातील कामाला सुरुवात झालेली आहे. सबब, ह्या उड्डाणपुलाच्या कामात कोणत्याही प्रकारचे ब्लास्टिंग करण्यात आलेले नाही.

(३) हे खरे नाही.

रस्त्यांच्या भरावामुळे गावात पाणी शिरलेले नाही. जे.एन.पी.ए. ने मागील दोन वर्षांत नवीन कल्व्हर्टसचे काम पूर्ण केलेले आहे. गावातील अंतर्गत नाले बंद/छोटे केल्याने/काही पाण्याचा निचरा होत नाही. जे.एन.पी.ए. ने जसखार गावाच्या सभोवतालच्या नाल्याच्या साफसफाईचे तसेच कल्व्हर्टसच्या साफसफाईचे काम दरवर्षी पावसाळ्यापूर्वी केलेली आहेत.

(४) जसखार गावातील ग्रामस्थांच्या विनंतीचा विचार करुन जे.एन.पी.ए. ने भारतीय तंत्रज्ञान संस्था, मुंबई (IIT) यांची नेमणूक केली असून ग्रामस्थांच्या मागणीनुसार सदर रस्ता ५-६ मीटर जे.एन.पी.ए. टाउनशिपच्या बाजूने सरकविण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अक्कलकुवा (जि.नंदुरबार) येथे नुपूर शर्मा यांनी केलेल्या वादग्रस्त वक्तव्यावरुन दंगल सदृश परिस्थिती निर्माण झाल्याबाबत

**(४५) * १६३८० श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अक्कलकुवा (जि.नंदुरबार) येथे नुपूर शर्मा यांनी केलेल्या वादग्रस्त वक्तव्यावरुन दिनांक १०/०६/२०२२ रोजी वा त्यासुमारास दंगल सदृश परिस्थिती निर्माण झाली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी स्थानिक पोलीस अधिकारी/कर्मचारी व पदाधिकारी यांनी अक्कलकुवा पोलीस स्थानकात तक्रार दाखल केल्यानंतर दंगलीस जबाबदार असणाऱ्या ४० आरोपींना अटक करुन काही लगेच त्यांची सुटका केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुख्य आरोपी यांनी सुटकेनंतर पोलीस स्थानकात तक्रार केल्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधीच्या गॅरेजमधील जे.सी.बी. मोडून पुन्हा दंगल पेटवण्याचा प्रयत्न केल्यामुळे त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी वरिष्ठ पोलीस अधिकारी, मा.गृहमंत्री यांच्याकडे दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ व तद्नंतर लेखी निवेदनाव्दारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दंगलीस जबाबदार असणाऱ्यांवर तसेच त्यांच्यावर कारवाई न करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) अक्कलकुवा, जि.नंदुरबार येथे नुपूर शर्मा यांनी केलेल्या वादग्रस्त वक्तव्यावरुन तणाव सदृश परिस्थिती निर्माण झाली होती. सदर तणाव सदृश परिस्थिती निर्माण करण्याऱ्यांविरुध्द एकूण ४ गुन्हे दाखल आहेत.

१) गु.र.क्र. २६०/२०२२, भा.दं.वि. कलम १५३-अ, ५०५ (२).

२) गु.र.क्र. २६१/२०२२ भा.दं.वि. कलम ३०७, ३५३, १४३, १४७, १४८, १४९, ३३६, ४२७, १२०-ब सह सार्वजनिक संपत्तीची हानी प्रतिबंध कायदा कलम ७, महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१)(३) चे उल्लंघन १३५ प्रमाणे

३) गु.र.क्र.२६२/२०२२ भा.दं.वि. कलम १४३, १४७, १४८, १४९, ३३६, ४२७, १२०-ब सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१)(३) चे उल्लंघन १३५ प्रमाणे

४) गु.र.क्र. २६४/२०२२ भा.दं.वि. कलम १५३-अ, ५०५ (२).

सदर चारही गुन्ह्यात अनुक्रमे १, ५६, ३० व १ असे एकूण ८८ आरोपी अटक करण्यात आले असून सर्व आरोपींना मा.न्यायालयाने जामीनावर मुक्त केले आहे.

(३) दिनांक १०/०६/२०२२ रोजी रात्री घडलेल्या घटनेबाबत दिनांक ११/०६/२०२२ रोजी अक्कलकुवा पो.स्टे. येथे दाखल गु.र.क्र. २६१/२०२२ मध्ये केलेल्या पंचनाम्यामध्ये स्थानिक लोकप्रतिनिधीच्या गॅरेजमधील जे.सी.बी. चे नुकसान झाल्याबाबत नोंद करण्यात आली आहे. त्यामुळे मुख्य आरोपी यांनी सुटकेनंतर पोलीस स्थानकात तक्रार केल्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधीच्या गॅरेजमधील जे.सी.बी. मोडून पुन्हा दंगल पेटवण्याचा प्रयत्न केला हे खरे नाही. सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने एकूण ५६ आरोपींना अटक करण्यात आली होती. त्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी सादर केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने स्थानिक पोलीस अधिकारी यांनी केलेल्या उचित कार्यवाहीबाबत लोकप्रतिनिधींना माहिती कळविण्यात आली आहे.

(४) या प्रकरणी आरोपी निष्पन्न करुन त्यांच्या विरोधात तात्काळ अटकेची तसेच कठोर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे शहरात चोरींच्या घटना वाढत असल्याबाबत

**(४६) * १५४८५ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात दिनांक २३ ते २९ ऑक्टोबर, २०२२ दरम्यान १२ घरफोड्यांच्या गुन्हयांत तब्बल ५१ लाख ७५ हजार रुपयांचा ऐवज चोरीला गेल्याचे निदर्शनास आले असून दिवाळीत सदनिकेला कुलूप लावून बाहेरगावी गेलेल्या नागरिकांच्या घरांतील मौल्यवान ऐवजांची चोरट्यांनी चोरी केल्याच्या घटना माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आल्या आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चोरटयांनी घरांबरोबरच किराणा दुकाने आणि मोबाईल दुकानेही फोडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त प्रकरणाचा सखोल तपास करण्याबाबत तसेच चोरटयांना अटक करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) पुणे शहरात माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये घरफोडीच्या आठ घटना झाल्या असून यामध्ये एकूण रुपये १,१८,२९,८००/- इतक्या रकमेचा मुद्देमाल चोरीला गेला आहे. सदर प्रकरणी अलंकार पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १३५/२०२२, व गु.र.नं. १३६/२०२२, वारजे पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.४५७/२०२२, लष्कर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १२४/२०२२, चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ४६८/२०२२ व गु.र.नं. ४६९/२०२२ आणि समर्थ पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १९२/२०२२, भा.दं. वि. कलम ४५४, ४५७, ३८० अन्वये गुन्हे नोंद करण्यात आले आहेत.

तसेच किराणा दुकाने व मोबाईल दुकाने फोडल्याप्रकरणी चार घटना झाल्या असून यामध्ये एकूण रुपये २१,४०,०००/- इतक्या रकमेचा मुद्देमाल चोरीला गेला आहे. सदर प्रकरणी हडपसर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १३२८/२०२२, वारजे माळवाडी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ४०९/२०२२, शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १६५/२०२२, भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ७०२/२०२२, भा.दं. वि. कलम ४५७, ३८०, ३४ अन्वये गुन्हे नोंद करण्यात आले आहेत.

उपरोक्त घरफोडी व दुकाने फोडीच्या गुन्ह्यांपैकी ३ गुन्ह्यांतील सात आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांचेकडून रुपये ९७,४३,६३५/- इतक्या रकमेचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यांचा तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरातील सायबर सेल अधिक सक्षम आणि अद्ययावत करण्याबाबत

**(४७) * १६०८१ ॲड.अनिल परब, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पोलिसांच्या आकडेवारीनुसार जानेवारी ते जुलै, २०२२ दरम्यान शहरात एकूण २,९५३ सायबर गुन्ह्यांची नोंद झाली असून त्यापैकी केवळ १४१ प्रकरणांची उकल करत ११८ आरोपींना अटक करण्यात आली आहे, हे खरे आहे,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सायबर गुन्हयांची उकल कमी होत असल्याने सायबर सेल अधिक सक्षम आणि अदयावत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) जानेवारी ते जुलै, २०२२ दरम्यान मुंबई शहरात एकूण २,९५३ सायबर गुन्हयांची नोंद झाली असून त्यापैकी १४१ प्रकरणांची उकल करत १९८ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

(२) पोलीस ठाणे निहाय सायबर सेल निर्माण करण्यात आले असून नियंत्रक अधिकारी म्हणून पोलीस निरीक्षक दर्जाचे अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. सायबर गुन्हयांना आळा बसावा या कामी पोलीस ठाणेतील कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना सायबर गुन्हे रोखण्याकरीता पोलीस उप आयुक्त,

सायबर गुन्हे, मुंबई यांचेकडून वेळावेळी प्रशिक्षण देण्यात येते. तसेच, त्यांना तांत्रिकरित्या क्लिष्ट गुन्हयांची उकल करण्याकरीता तांत्रिक मदत पुरविण्यात येते. तसेच, आतापर्यंत स्थानिक पोलीस ठाणेचे एकूण २८८५ अधिकारी व अंमलदार यांना सायबर गुन्हे शाखेकडून सायबर गुन्हयांच्या तपासाबाबत प्रशिक्षण देण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील डोमिहीरा नदी प्रकल्पांतर्गत बांधण्यात आलेल्या धरणातील पक्षीभिंतीतून पाण्याची गळती होत असल्याबाबत

**(४८) * १६२८८ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे व पालघर जिल्ह्यात पाणीटंचाईवर मात करण्यासाठी व जमिनीच्या भूगर्भातील पाणी साठ्यात वाढ व्हावी या उद्देशाने ‘पाणी आडवा पाणी जिरवा’ या संकल्पनेतून पालघर (ता.जव्हार)जिल्ह्यातील ‘डोमिहीरा’ नदी प्रकल्पांतर्गत धरण बांधण्यासाठी १३२ कोटी रूपये कोकण पाटबंधारे विकास महामंडळातर्गत खर्च करून सन २०१० अखेरपर्यंत धरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धरणामध्ये पूर्ण क्षमतेने पाणी साठा करण्यास सुरूवात झाली अशातच सन २०१२ मध्ये सांडण्यातून व पक्षीभिंतीतून पाणी गळती होत असल्याने गळती प्रतिबंधात्मक उपाययोजना करून देखील पाणी गळती थांबलेली नाही त्यानुषंगाने जलसंपदा विभागाने घटीत केलेल्या चौकशी समितीने शासनास दिलेल्या अहवालात सांडण्याचे काम सदोष झाले असल्याचे स्पष्ट केले आहे व त्यानुसार संबंधित कंत्राटदारांवर कारवाई करत १२-७० लाख रूपयांचा दंड ठोठावण्यात आला होता, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, दररोज हजारो लीटर पाणी गळतीमुळे वाया जात असून डोमिहीरा (खडखड) धरणापासून ७ किमी अंतर असलेल्या जव्हार शहराला या धरणातून १.२८ दल मीमी इतका पाणीसाठा आरक्षित करण्यात आला आहे शासनाचे १३२ कोटी रूपये खर्च करूनही या धरणाचा कोणताही उपयोग जव्हार तालुक्याला झाला नसल्याचे निदर्शनास येत आहे सरकारी अधिकारी व ठेकेदार यांच्यामुळेच सदर योजना निरुपयोगी ठरल्याने आजही एप्रिल-मे महिन्यात पाण्याची कमतरता भासत असते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर धरणाच्या निर्मितीसाठी खडखड, खरवंद, बोरहट्टी आदी (ता.जव्हार) आदिवासी गावातील सुमारे १०० शेतकऱ्यांच्या जमिनी एकरी अकरा हजार इतक्या कमी भावाने संपादित करण्यात आल्याने शेतकऱ्यांचेही खूप नुकसान झाले असून काही वर्षापासून धरणाच्या विभाजक भिंतीतून पाणी गळती होत आहे तसेच धरणाच्या पाण्यापासून वीज निर्मिती प्रकल्प अद्यापही सुरू झालेला नाही, याबाबत या प्रकरणाची विनाविलंब सखोल चौकशी करण्यात यावी अशी येथील आदिवासी शेतकऱ्यांनी शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित सरकारी अधिकारी व ठेकेदार यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंशतः खरे आहे.

डोमिहिरा नदी प्रकल्प, ता.जव्हार, जि.पालघर या लघु पाटबंधारे प्रकल्पांतर्गत धरणाचे काम सन २०१० पर्यंत पूर्ण करण्यात आले आहे. प्रकल्पांतर्गतचे धरण बांधण्यासाठी रुपये ६९.४० कोटी इतका खर्च झालेला असून ऑक्टोबर, २०२२ अखेर प्रकल्पावर एकूण रुपये १०१.३२ कोटी खर्च झालेला आहे. प्रकल्पाच्या कालव्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

डोमिहीरा (खडखड) प्रकल्पाची एकूण साठवण क्षमता १४.४८८ दलघमी इतकी असून सन २०१० पासून पूर्ण क्षमतेने पाणीसाठा होत असून प्रकल्पातून २.२६ दलघमी पाणीसाठा पिण्याकरीता राखीव आहे. प्रकल्पाच्या पूर्ण झालेल्या कालवा कि.मी. ० ते १० मध्ये ३१३ हे. सिंचन निर्मिती झालेली असून मागणीनुसार सिंचनास पाणीपुरवठा करण्यात येत आहे. धरणापासून १० किमी अंतर असलेल्या जव्हार नगरपरिषदेकरीता या धरणातून शासनस्तरावरून १.२८ द.ल.घ.मी. प्रती वर्ष इतका पाणीसाठा आरक्षित करण्यात आला होता. परंतु जव्हार नगरपरिषदेने त्यांच्या तांत्रिक अडचणीमुळे विहित कालावधीत करारनामा न केल्याने सदर आरक्षण रद्द झाले आहे. यानंतर जव्हार नगरपरिषदेकडून नव्याने आलेल्या पाणी आरक्षण प्रस्तावानुसार ०.४९ द.ल.घ.मी. प्रती वर्ष इतका पाणीसाठा या धरणातून आरक्षित करण्यात आला आहे. सदर आरक्षणानुसार करारनामा करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर असून जव्हार नगरपरिषदेकडून पाणीपुरवठा योजनेचे काम अद्याप पूर्ण झालेले नसल्याने जव्हार शहरास पाणीपुरवठा करणे अद्याप चालू झालेले नाही. जव्हार नगरपरिषद व्यतिरीक्त इतर संस्थांकडून विहित पाणी आरक्षण मागणी प्रस्ताव अद्याप प्राप्त झालेले नाहीत. मागील तीन वर्षांच्या तपशीलानुसार सर्व आवश्यक सिंचन व बिगरसिंचन वापरानंतर व पक्षभिंतीतील गळतीनंतरही, मे महिन्याच्या अखेरीस धरणामध्ये पाणीसाठा शिल्लक असतो.

(४) अंशतः खरे आहे.

या धरणाच्या बुडीत क्षेत्रातील खडखड, खरवंद, बोरहट्टी आदी (ता.जव्हार) आदिवासी गावातील १००.४३ हेक्टर क्षेत्राचे भुसंपादन सन २००३-०४ पर्यंत तत्कालीन प्रचलित तरतूदींनुसार विशेष भुसंपादन अधिकारी, ठाणे यांचेकडून पूर्ण करण्यात आलेले असून संपूर्ण मोबदला अदा करण्यात आलेला आहे.

या धरणाच्या सांडव्यातून व पक्षभिंतीतून गळती होत असल्याचे सन २०१२ पासून निदर्शनास आले असून सांडव्यातील होणाऱ्या गळतीबाबत गळतीप्रतिबंधक कामे पूर्ण करण्यात आली असून या कामामुळे सांडव्यातील गळती सद्य:स्थितीत थांबली आहे. तसेच पक्षभिंतीतील गळती थांबविण्यासाठीचे काम हाती घेण्यात आले असून सदर काम जून-२०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. धरणाच्या पाण्यापासून वीज निर्मिती करण्याचा प्रकल्प अद्याप सुरू झालेला नसून याबाबत शासनाच्या प्रचलित धोरणानुसार कार्यवाही करण्यात येणार आहे.

डोमिहीरा (खडखड) प्रकल्पाच्या वरील सद्य:स्थितीबाबत विनाविलंब सखोल चौकशी करण्याबाबत स्थानिक आदिवासी शेतकऱ्यांनी शासनाकडे मागणी केलेली नाही.

(५) या प्रकरणी शासनाने चौकशी पूर्ण केली आहे.

सदर चौकशीच्या अनुषंगाने संबंधित सरकारी अधिकारी यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम,१९७९ च्या नियम ५ (१)(एक) मधील तरतूदीनुसार कारवाई करण्यात आली आहे. चौकशीच्या अनुषंगाने संबंधित कंत्राटदारांवर कारवाई करत रुपये १२.७० लक्ष रूपयांचा दंड ठोठावण्यात

आला आहे. तसेच शासनाच्या दिनांक ०७/०३/२०१८ च्या पत्रानुसार गळती प्रतिबंधक उपाय योजनेसाठी येणारा खर्च मूळ कंत्राटदारांकडून वसूल करण्याच्या सुचना आहेत. त्यानुसार संबंधित ठेकेदाराकडून सांडव्याच्या गळती प्रतिबंधक कामापोटी रुपये २६२.२६ लक्ष व दंडात्मक वसुलीपोटीचे रुपये १२.७० लक्ष असे एकूण २७४.९६ लक्ष रकमेची वसुली करण्यात आलेली आहे.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.